
# माणूस

ONE DIMENSIONAL MAN

१७ मे १९६९ । ५० पैसे



समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : आठवे : अंक : एक्कावन्नावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
सहाय्यक : दिलीप माजगावकर, सौ. निर्मला पुरंदरे

स. न. मे, ३

मागील अंकातले 'आधुनिक विज्ञानेश्वरी' हे सदर आवडले. शक्यता किंवा संभवनीयता या विषयावर या प्रकारे मजकूर लिहावा असे मला अनेकदा वाटे, पण विषयाला सुरुवात कशी करावी हे कळत नव्हते. हे दाभोळकरांना मात्र जमले. अर्थात (ब) व (क) यांतली विधाने थोडी सैल आहेत. कारण प्रत्येक खेपेला अपत्य मुलगा किंवा मुलगी असण्याची शक्यता तीच नसते. आणि एकूण जननात देखील हे प्रमाण ५०%–५०% नसते तर ४९%–५१% असते. जर माणूसचे वाचक १०,००० असले तर अशी किती पत्रे येण्याची त्यांची अपेक्षा आहे.

नी. मा. डोंगरे, मुंबई.

स. न. मे, ५

दि. ३ मेच्या 'माणूस'मधली श्रमिक नगर व अयोध्या नगर, ही सदरे वाचली. मुंबई शहरातील लाखो झोपडी-वासियांच्या व जुन्या चाळींतून राहणाऱ्या लोकांच्या दु:खांना वाचा फोडल्याबद्दल धन्यवाद.

तु. कृ. सरमळकर, मुंबई.

किंमत : ४० पसे
१०२५ सदाशिव
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतील व असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

# मला समजलेले मार्क्यूज

श्री. मा. भावे

प्रा. हर्बर्ट मार्क्यूज यांचे नाव अलीकडेच प्रसिद्धीस आले आहे. गेल्या वर्षी पाश्चात्य जगात विद्यार्थ्यांच्या असंतोषाने उग्र रूप धारण केले. फ्रेंच, जर्मन व अमेरिकन विद्यापीठांतून विद्यार्थ्यांनी बंड पुकारले. त्या वेळी असे सांगण्यात आले की, विद्यार्थ्यांतील असंतोषाचे मूळ प्रा. मार्क्यूज व शे गेव्हारा यांच्या तत्त्वज्ञानात सापडले.

प्रा. मार्क्यूज यांचा One Dimensional Man हा ग्रंथ १९६४ साली प्रसिद्ध झाला. त्यातील विचारांची ओळख करून घेण्याच्या दृष्टीने हा लेख लिहिला आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेत एका नव्याच युगाचा उदय झाला. मानवी इतिहासात जे शक्य झाले नव्हते ते प्रत्यक्षात येणार अशी आशा निर्माण झाली. आजपर्यंतचा मनुष्य-संस्कृतीचा इतिहास म्हणजे जगण्यासाठी केलेल्या धडपडीची कथा आहे. पण या नवयुगात अमेरिकेतील समृद्धी इतकी वाढली की, मूलभूत गरजा भागविणे त्रासाचे उरले नाही. जगणे हे साध्य



उरले नाही. स्वयंचलित यंत्रे बसविल्यानंतर तर जीवनविषयक गरजा भागविण्यासाठी करावे लागणारे श्रम अगदीच कमी झाले. उपभोगाची साधने मुबलक झाली. इतकेच नव्हे तर, आधी उपभोगसाधने उत्पन्न करावीत व नंतर ती खपण्यासाठी जाहिरातीद्वारा गरज निर्माण करावी अशी चमत्कारिक स्थिती प्राप्त झाली.

यामुळे संपूर्ण समाजरचनचा व सामाजिक तत्त्वज्ञानाचाच पुर्नविचार सुरू झाला. One Dimensional Man यां पुस्तकात अमेरिकेतील सध्याचा समाज व त्याचे तत्त्वज्ञान यांचे परीक्षण करून भविष्यकाळाचे संक्षिप्त दिग्दर्शनही केले आहे.

प्रस्थापित समाजाविषयी बोलताना प्रा. मार्क्यूज म्हणतात की, हा एक सर्वंकष व सर्वसमावेशक समाज आहे. विरोधालाही आपल्यात सामावून घेण्याचा या समाजाचा प्रयत्न असतो. त्यामुळे विरोधाला स्थानच उरत नाही. प्रस्थापित समाजात समाविष्ट नाहीत अशा व्यक्ती, वर्ग अगर विचार उरूच द्यावयाचे नाहीत, अशी तरतूद या समाजाच्या रचनेत असल्याने समाजाच्या घटनेत मूलभूत बदल होण्याची शक्यताच राहिलेली नाही.

## काल्पनिक स्वातंत्र्य

सध्या समाजाने प्रत्येक व्यक्तीला पूर्णपणे बांधून टाकले आहे. व्यक्तीवरील ही

बंधने अनेक प्रकारची आहेत. पहिला प्रकार म्हणजे व्यक्तीला विकीर्ण करावयाचे. उदा० हॅरी म्हणजे कोण तर फोर्ड कंपनीतील सेल्समन, न्यूयॉर्क येथे राहणारा, दोन मोटारी व एक घर यांचा मालक, मेरीचा नवरा आणि जॉन व डिक यांचा बाप इत्यादी. हॅरी ही व्यक्ती अशा रीतीने वस्तू व इतर व्यक्ती यांच्यांत विभागली जाते. व्यक्तिमत्त्व मारले जाते. दुसरा प्रकार असा : प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य आहे, असा भास निर्माण केला जातो. बोलणे, नोकरी करणे, मालमत्ता विकत घेणे या गोष्टींवर कोणतीही कायदेशीर बंधणे नसतात. पण वृत्तपत्रे, टेलिव्हिजन, चित्रपट यांच्याद्वारे व्यक्तींची मनेच अशी बनविली जातात की, सर्व समाजाला योग्य वाटतील अशाच गोष्टी व्यक्ती करते. तिसरी पद्धती म्हणजे प्रत्येक व्यक्तीला समाधानी आयुष्य जगता येईल अशी सोय समाजाने केलेली असते. काही ध्येय डोळ्यांपुढे ठेवून माणूस काम करतो व ध्येय साध्य होते तेव्हा मनुष्याला समाधान वाटते. सांप्रतच्या औद्योगिक समाजात प्रत्येक व्यक्तीचे ध्येय समाजच ठरवितो आणि ते ध्येय सहजसाध्य होईल अशी तरतूदही उत्पादनव्यवस्थेत केलेली असते. साहजिकच ध्येय ठरविल्याचे व सिद्ध केल्याचे फसवे समाधान प्रत्येक व्यक्तीला लाभते.

आजपर्यंत जे जे मानवी समाज अस्तित्वात आले त्या त्या प्रत्येक समाजात समाजाशी एकरूप न झालेला असा वर्ग असे. अगदी अलीकडच्या काळातही समाजाशी एकरूप न झालेला असा कामगार वर्ग होता. अशा वर्गाचे अस्तित्व हे त्या समाजघटनेतील त्रुटीचे द्योतक होते. परंतु प्रस्थापित अत्यौद्योगिक समाजात कामगारवर्गाची समाजाशी चाललेली बंडखोरी बोथट व विसविशीत झाली आहे. कामगारवर्ग प्रचलित उत्पादन-व्यवस्थेत पूर्णपणे विलीन झाला आहे. असे होण्याची कारणेही अनेक आहेत. पहिले कारण असे की, कामगार संघटनांना उत्पादन-व्यवस्थेत व फायद्यात वाटा देण्यात आला. त्यामुळे कामगार संघटना ह्या उत्पादन-वाढीला कामगार साहाय्यभूत कसा होईल इकडेच लक्ष देऊ लागल्या. उत्पादनाचे साधन हे कामगाराचे स्वरूप कायमच राहिले. दुसरे कारण असे की, काम पूर्वीइतके शारीरिक कष्टाचे उरले नाही. कामगार श्रमिक न राहता व्यवस्थापक झाले. यंत्र व कामगार यांच्यांत जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले. या सर्वांमुळे कामगाराच्या मनोवृत्तीत बदल झाला. त्याचे लढाऊ स्वरूप अस्तंगत झाले. तिसरे असे झाले की, एकंदर समृद्धीत अतिशय वाढ झाल्यामुळे मांडवलदार व कामगार यांच्या उत्पन्नातील तफावत कायमच असली तरी त्याची जाणीव बोचक राहिली नाही. मांडवलदार हा कामगाराच्या द्वेषाचे लक्ष्य राहिला नाही. सारांश, या विविध कारणांमुळे प्रचलित समाजात बदल करण्याची इच्छा असणारा एकमेव कामगारवर्गही लढाऊ राहिला नाही.

समाजात जर वैचारिक व्यवहार सुरू असेल तर त्यातूनही सामाजिक बदलाला गती मिळते. विचार-व्यवहार हा ललित वाङ्मय आणि वैचारिक वाङ्मय या दोहों-

तून होत असतो. त्यांपैकी वैचारिक वाङमयाचाच विचार येथे केला आहे. वैचारिक वाङमयाचे नियंत्रण कसे केले जाते ते आता पाहू.

पहिली गोष्ट म्हणजे विचार–व्यवहार ज्या भाषेतून होतो त्या भाषेचेच नियंत्रण सध्याच्या अत्यौद्योगिक समाजात केले जाते. भाषेतील प्रत्येक शब्दाचा वापर त्या शब्दाच्या पदार्थरूप व क्रियारूप अर्थांच्या संदर्भातच केला पाहिजे, असा आग्रह धरण्यात येतो. यामुळे विचार-व्यवहारावर बंधने पडतात आणि विचार बोथट, शिथिल व विसविशीत होतो. उदाहरणार्थ, 'आम्हांला कमी पगार मिळतो' या विधानाची वासलात कशी लागते ते पाहू. प्रथमतः हे वाक्य संदिग्ध स्वरूपाचे आहे असे मानून विधान करणाऱ्या कामगाराची मुलाखत घेऊन वाक्याची अर्थनिश्चिती करण्यात येते, वाक्याचा निश्चित झालेला अर्थ असा : प्रस्तुत कामगाराची पत्नी रुग्णालयात आहे. डॉक्टराच्या बिलाची त्याला काळजी वाटते. यामुळे तक्रारीत तथ्य एवढेच दिसते की, पत्नीच्या आजारामुळे या कामगाराचा सध्याचा पगार त्याची सध्याची गरज भागविण्यास पुरेसा नाही.

मूळ वाक्य व निश्चित अर्थ देणारे वाक्य यांतील फरक महत्त्वाचा व सहज ध्यानात येण्याजोगा आहे. मूळ वाक्यात एका विशिष्ट घटनेला सार्वत्रिकता देण्यात आली होती. विशिष्ट व्यक्ती, कारखाना आणि परिस्थिती यांच्या पलीकडे जाण्याचा प्रयत्न मूळ तक्रारीत केला होता. रूपांतरित वाक्यात या तक्रारीला वैशिष्ट्य देण्यात आले आहे. त्यामुळे तक्रारीतील धार कमी झाली.

दुसरी गोष्ट अशी की, विचार–व्यवहार फारच सीमित करण्यात आला आहे. सामाजिक घटनांचे मूल्यमापन करावयाचे असेल तर मोजपट्ट्या त्या समाजातील मूल्यांच्याच असून भागणार नाही. परंतु प्रस्थापित समाजात अस्तित्वात असलेल्या गोष्टींची दखल घेणे म्हणजेच मूल्यमापन असे समजले जाते.

वरील विधानाचे विवेचन करण्यासाठी प्रा. मार्क्यूज यांनी 'निवडणुकांच्या लोकशाही स्वरूपाचे मूल्यमापन' या प्रबंधाचे उदाहरण घेतले आहे. या प्रबंधात लोकशाही निवडणुकांचे खालील निकष संशोधकांनी मानले आहेत– १ : लोकशाही निवडणुका कमीत कमी दोन उमेदवारांत होतात. प्रत्येकाची निवडून येण्याची शक्यता सारखीच असते. २ : लोकशाही निवणुकींत दोन्ही पक्ष आपापले उमेदवार राखण्याची, स्वतंत्र मतदार मिळविण्याची व विरुद्ध पक्षांचे उमेदवार फोडण्याची खटपट करतात. ३ : लोकशाही निवडणुकीत पक्ष चालू निवडणुका जिंकण्याचा प्रयत्न तर करतातच, पण पुढील निवडणुकीतही आपले उमेदवार निवडून यावेत असे प्रयत्न करतात.

हे निकष वापरण्यात चूक अशी आहे की, चालू स्थितीचे मूल्यमापन करण्यासाठी वापरावयाचे निकष चालू स्थितीतूनच निर्माण झाले आहेत. चांगला राजा हा शिवाजीसारखा असावा असे म्हणावयाचे व म्हणून शिवाजी हा चांगला राजा

होता असा निष्कर्ष काढावयाचा अशातलाच हा प्रकार आहे. विचार क्षेत्राची अशा रीतीने कोंडी झाली असून परीक्षण हे त्याच आवर्तनातून पुनः पुन्हा फिरत राहते.

याप्रमाणे समाजस्थितीला विरोध निर्माण होण्याची जी तीन स्थाने आहेत त्या तीनही स्थानांवर समाजाचे घट्ट नियंत्रण आहे. त्यामुळे समाजात बदल होण्याची शक्यताच उरलेली नाही. समाजातील विचार त्याच कक्षेत गुरफटून गेले आहेत. एका समृद्ध, सुसंपन्न आणि सामर्थ्यशाली समाजाची ही अवस्था का झाली असावी याचा उलगडा करावयाचा असेल तर ज्या तत्त्वज्ञानातून हा अत्यौद्योगिक समाज निर्माण झाला त्या तत्त्वज्ञानाचे विवेचन करणे आवश्यक आहे.

## न्याय आणि तर्क

अत्यौद्योगिक संस्कृतीचे तत्त्वज्ञान निर्माण होण्यापूर्वी ग्रीक तत्त्वज्ञान प्रचलित होते. या तत्त्वज्ञानात अनुभवले जाणारे जग मायावी असते असे मानले होते. या मायावी जगात श्वेत व कृष्ण अशा दोन शक्ती असतात. श्वेतशक्ती मायावी जगाच्या पलीकडे असणाऱ्या जगाची कल्पना करतात. कृष्ण शक्तींचा पाडाव करून श्वेत शक्ती अस्तित्वाला नव्या व वरच्या पायरीवरील जगात नेतात. मायावी जगाच्या पलीकडील जग हेच सत्य जग होय.

याप्रमाणे सत्य हे प्रत्यक्षापेक्षा निराळे असते. सत्य मिळविण्यासाठी अनुभवाला येणारे जग मोडले पाहिजे, बदलले पाहिजे, असा ग्रीक तत्त्वज्ञानाचा अभिप्राय होता. सत्याविषयीच्या कल्पनेत एक प्रकारची बंडखोरी आणि अस्तित्वात असलेल्या जगाला आव्हान होते.

प्रत्यक्ष स्थितीला दिलेल्या आव्हानाचे स्वरूप कोणते होते ? प्रत्यक्ष स्थितीतील वस्तूचे व मनुष्याचे संबंध एका उच्चतर पातळीवरील जगाच्या संदर्भात तपासले जात. त्या कल्पित जगातील संबंधांपेक्षा सध्याच्या जगातील संबंध वाईट प्रकारचे आहेत असे दाखवून देण्यात येई. प्राप्त स्थितीतील संबंध वरच्या दर्जाच्या संदर्भात तपासण्यासाठी जी विचारपद्धती निर्माण झाली तिला Apophantic Logic असे म्हणतात. याला आपण मराठीत न्याय असे म्हणू.

परंतु वरच्या दर्जाचे जे जग कल्पावयाचे ते कोणत्या आधारावर? ग्रीकांच्या मते प्रत्यक्ष जगातील व्यक्तींचे अगर वस्तूंचे संबंध तपासताना विचार हा विशिष्ट व्यक्ती अगर वस्तू यांच्या पलीकडे जातो. व्यक्तीच्या आणि वस्तूच्या घाटांचे परीक्षण विचार करू लागतो. घाटांचे परीक्षण करताना विचार प्रत्यक्षाच्या पलीकडे जातो. अशा रीतीने वरच्या दर्जाच्या जगाची निर्मिती होते. जगातील वस्तू व व्यक्ती यांचे घाटांच्या स्वरूपात परीक्षण करण्याची जी विचारपद्धती तिला Formd Logic असे म्हणतात. त्याला आपण मराठीत तर्कशास्त्र असे म्हणू.

न्यायशास्त्र व तर्कशास्त्र यांतील फरक महत्त्वाचा आहे. न्याय हा प्राप्त स्थिती-

वरील संबंध नुसते तपासतच नाही तर एका निराळ्या जगाच्या संदर्भात ते संबंध चांगले आहेत की वाईट आहेत याचा निर्णयही करतो. त्यामुळे न्यायाला प्रस्थापित संबंधांच्या मूल्यांकनाचे स्वरूप येते. या उलट तर्कशास्त्राला संबंधांचे मूल्यांकन अभिप्रेत नाही. संबंधांची सारणी लावणे हे तर्कशास्त्राचे कार्य होय.

ग्रीकांचे युग संपल्यावर शास्त्रीय विचारांचे युग सुरू झाले व शास्त्रीय विचार हीच प्रचलित विचारपद्धती आहे. शास्त्रीय विचारांत न्यायापेक्षा तर्कालाच अधिक महत्त्व आहे आणि तर्काचा उपयोग प्राप्त स्थितीला सयुक्तिकता देण्यासाठी करतात. स्थितीला सयुक्तिकता देणे याचा अर्थ तिच्यातील सुसंगती दाखविणे. उदा. झाडावरून फळ खाली पडते ही प्रत्यक्ष स्थिती आहे. या स्थितीला सयुक्तिकता देण्यासाठी आपण गुरुत्वाकर्षणाचा सिद्धांत मांडून असे म्हणतो की, झाडावरून फळ खाली पडणे हे त्या सिद्धांताशी सुसंगत आहे.

शास्त्रीय विचाराच्या कार्याचे स्वरूप असे असल्याने शास्त्रीय विचारांत दोन दुर्गुण निर्माण झाले. पहिला म्हणजे शास्त्रीय विचारसूत्रांच्या बाबतींत उदासीन राहिला. तर्कशास्त्राचा एक विशिष्ट प्रकार एवढेच त्याचे स्वरूप राहिले. न्यायाचा दर्जा त्यात आला नाही. स्थितीला सयुक्तिकता देण्यात स्थिती चांगली आहे की वाईट, याचा निर्णय टाळण्यात आला. दुसरा दुर्गुण म्हणजे प्राप्त स्थितीची सयुक्तिकता तपासताना शास्त्रीय विचाराने प्राप्त स्थितीला प्रतिष्ठा दिली. प्राप्त स्थितीवर सयुक्तिकतेचा बुरखा चढल्याने ती कमी अन्यायकारक व सत्याच्या जवळची अशी वाटू लागली.

शास्त्रीय विचारांचे स्वरूप अशा प्रकारचे असल्याने त्याचा मनुष्यजातीच्या प्रगतीवर घातुक परिणाम झाला. शास्त्र स्थितिवादी असल्याने माणसा-माणसांतील संबंध शास्त्र ज्या काळात निर्माण झाले त्या काळातीलच राहिले. त्यांत बदल झाला नाही. शास्त्रीय विचारांची बैठक विशिष्ट प्रकारची असल्याने सामाजिक संबंध पुरातन स्वरूपाचेच राहिले.

शास्त्रीय विचार जेव्हा निर्माण झाला त्या काळात जीवनकलह तीव्र होता. त्यामुळे माणसे ही उत्पादनव्यवस्थेचे अंग होती. उपभोग्य वस्तूंच्या उत्पादनाचे साधन एवढाच माणसाचा दर्जा होता. उत्पादनाशी माणूस जखडला गेला होता. विज्ञानाच्या प्रगतीने जीवनकलहाची तीव्रता कमी झाली; पण त्यामुळे मनुष्याचा दर्जा सुधारला नाही. कारण संबंध बदलणे हे आपले कार्य आहे असे शास्त्रीय विचाराने कधी मानलेच नाही. उत्पादनाच्या जोखडातून मनुष्याची मुक्तता होणे दूरच राहिले. उलट बंधने वाढत मात्र गेली. कारण, प्रस्थपित संबंध अधिक सयुक्तिक व तर्कशुद्ध झाले.

आतापर्यंत आपण अत्यौद्योगिक समाजातील विचारांची कोंडी व त्या कोंडीचे सामाजिक तत्त्वज्ञानात सापडणारे मूळ यांचे विवेचन केले. आता ही कोंडी फुट-

ण्याची कितपत शक्यता आहे व सध्याची अत्यौद्योगिक संस्कृती नाहीशी झाल्यास काय होईल याचा अंदाज घेऊ.

## संस्कृतीचे आवर्त

प्रत्येक मानवी संस्कृती ही एखाद्या आवर्तासारखी असते. हे संस्कृतीचे आवर्त एकत्र ठेवण्यासाठी एक विचारप्रणाली त्या संस्कृतीत निर्माण झालेली नसते. ही विचारप्रणाली प्रत्येक गोष्टीकडे बघण्याचा एक दृष्टिकोण निर्माण करते. सध्याच्या अत्यौद्योगिक युगात ही विचारप्रणाली शास्त्रीय विचारप्रणाली आहे. या विचार-प्रणालीनुसार प्रत्येक वस्तू व मनुष्य यांकडे उत्पादनाचे साधन म्हणूनच पाहिले जाते.

परंतु संस्कृतीच्या आवर्तातून ज्या शक्ती निर्माण होतात त्या प्रचलित विचा-राच्या समजुतीपलीकडच्या असतात. या नवीन शक्तींना सयुक्तिक स्वरूप प्रस्था-पित विचार देऊ शकत नाहीत. त्यामुळे मूळ आवर्तातून वरच्या पातळीवरील एक नवेच आवर्त निर्माण होते. अशा रीतीने संपूर्ण मानवी इतिहास हे एक विशाल असे ऊर्ध्वगामी आवर्त आहे आणि या महान् ऊर्ध्वगामी आवर्ताच्या मूळ सूत्रावर प्रत्येक मानवी युगाचे आवर्त बसविलेले असते.

यावरून हे स्पष्ट होईल की, प्रचलित शास्त्रीय विचार आणि सध्याची अत्यौ-द्योगिक संस्कृती हे काही मानवी विकासाचे अंतिम टप्पे नाहीत. या दोहोंपेक्षा निराळा विचार व निराळी संस्कृती संभवनीय आहेत. या अनागत संस्कृतीचे स्वरूप कसे असेल याविषयी अनेक प्रकल्प करता येतील. या प्रकल्पांतील सत्य प्रत्कल्प कोणते हे ठरविण्यासाठी काही निकषही सांगता येतात. १ : प्रकल्पात सध्याच्या संस्कृतीचे एकत्रित चित्रण अगर तिचा आढावा असला पाहिजे. २ : प्रचलित संस्कृतींतील विचार व उपभोग्य वस्तू यांच्या संपत्तीच्या संदर्भात नवी संस्कृती संभवनीय असली पाहिजे. ३ : सध्याच्या संस्कृतींतील उपभोग्य संपत्तीत नवीन संस्कृतीने भर टाकली पाहिजे. ४ : संकल्पित संस्कृतीत जीवनकलहाचा अधिक उपशम होण्याची शक्यता असली पाहिजे.

अशा एका संभवनीय संस्कृतीच्या काही अंगांचे चित्रणही प्रा. मार्क्यूज यांनी केले आहे. शास्त्रीय विचार आज मूल्यनिरपेक्ष आहे. तो मूल्यसापेक्ष होईल. त्यामुळे आज जी मूल्ये गुणात्मक वाटतात ती संख्यात्म होतील. स्वातंत्र्य, समता आदी मूल्ये संख्येत मोजता येतील. जीवनकलहाचा अधिक प्रमाणांत उपशम होईल. मूलभूत गरजा भागविण्यासाठी करावे लागणारे श्रम अगदी कमी होतील.

पण असे जर व्हावयाचे असेल तर सध्याची अत्यौद्योगिक संस्कृती नाहीशी झाली पाहिजे. पण या संस्कृतीत बदल होण्याची शक्यता फारच थोडी आहे. इतर वंशांचे आणि सध्याच्या संस्कृतींतील उत्पादन प्रक्रियेत जे भाग घेत नाहीत असे निग्रो लोक, तरुण गोरे लोक इत्यादी या संस्कृतीवर बाहेरून हल्ले करीत आहेत

[ पृष्ठ ५७ वर ]

# प्रा. सरदार यांचा सत्कार

दिनांक १ मे. स्थळ–पुण्यातील गोखले अर्थशास्त्र संस्थेचे रा. रा. काळे सभागृह. दुपारी तीनची वेळ. लेखक, विचारवंत, संपादक, प्राध्यापक, कार्यकर्ते अशा मान्यवर व्यक्तींनी सारे सभागृह फुलून गेले होते. जणू एक छोटासा दरबारच भरला होता.

प्रा. गं. बा. सरदार यांनी वयाची साठी ओलांडल्याच्या निमित्ताने ओरिएंट लॉंगमन्स प्रकाशन संस्थेने आणि प्रा. सरदारांच्या मित्रांनी हा दरबार आयोजित केला होता. दरबाराची सूत्रे होती माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या हाती.

सरदारांच्या गौरव–ग्रंथाचे संपादक प्रा. भा. शं. भणगे यांनी प्रास्ताविक भाषण करून मुख्य पाहुण्यांचे स्वागत केले. त्यानंतर डॉ. मु. ग. पानसे यांनी आपले भाषण वाचून दाखविले. संतसाहित्याचे परिशीलन करता करता भोवतालच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीचे चिंतन करणाऱ्या मार्क्सवादी सरदारांच्या समतोल विचारसरणीचा त्यांनी थोडक्यात परिचय करून दिला. नंतर म. म. दत्तो वामन पोतदार बोलले. प्रा. सरदार यांच्यामध्ये शांत वृत्ती, व्यासंग आणि विचारीपणा यांचा त्रिवेणी संगम झालेला आहे. जितक्या गोष्टी करता येणे शक्य आहे तितक्या गोष्टी करण्याचा त्यांचा प्रयत्न असतो, अशा शब्दांत सरदारांना गौरवून त्यांनी आटोपते घेतले. खरे तर नेहमीसारखे मिस्कीलपणे बोलणारे पोतदार काही रंगले नाहीत एवढे खरे.

पोतदारांच्या भाषणापाठोपाठ 'साहित्यविचार आणि समाजचिंतन' या गौरवग्रंथाचे आणि 'संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुती' या डॉ. कुमुद मेहता यांनी केलेल्या सरदारांच्या ग्रंथांच्या इंग्रजी अनुवादाचे मा. यशवंतराव चव्हाण यांनी प्रकाशन केले. सरदारांचा गौरव करताना ते म्हणाले की, " राजकीय मामला हा विचारांचा मामला आहे. विचारांची देवाणघेवाण व फेरतपासणी करण्यास राज-

कीय क्षेत्रातच अधिक वाव मिळतो. प्रा. सरदारांचा वचारिक क्षेत्राप्रमाणेच राजकीय क्षेत्राशीही दृढ परिचय आहे. प्रथम विचार करून मगच आचार केला पाहिजे. प्रथम आचार मग विचार असे झाल्यास प्रगती खुंटते. विवेकाची कसोटी असलेल्या व्यक्तीलाच समाजात स्थान मिळवता येते. झपाट्याने बदल होत जाणाऱ्या समाजात संघर्ष निर्माण होतात, तेव्हा सांधा जुळवण्याचे अवघड काम विचारवंतांनी करायला हवे."

## ऋणनिर्देश

यानंतर स्वतः सरदार बोलायला उभे राहिले. "आज प्रथम मला ऋणनिर्देश करणे आवश्यक आहे. मला सदिच्छेची खूप मोठी अनुकूलता लाभली. तसेच संसारातही मला लक्ष घालावे लागले नाही अगदी परवापरवापर्यंत माझे वडील हयात होते. आज माझे वडील नाहीत, परंतु माझी आई इथे उपस्थित आहे. मी तिला मुद्दाम इथे घेऊन आलो आहे. कारण माझ्यावर आईवडिलांचे फार मोठे ऋण आहे. कोणासाठीही कष्ट करण्याची, झीज सोसण्याची प्रेरणा मला आईकडून मिळाली. या सर्व अनूकूलतेमुळे मला चिंतन करणे शक्य झाले."

ऋणनिर्देशाचा भाग संपला आणि सरदारांचा सच्चा सूर लागला. व्यासपीठाच्या मागच्या पडद्यावर असलेली लालपिवळ्या फुलांची ज्योत खरी असल्याचा भास होऊ लागला. सरदार बोलतच होते, "मी लहानाचा मोठा झालो तो वारली, ठाकुर अशा आदिवासी लोकांच्या सान्निध्यात. माझ्या अनेक गरीब मित्रांची मातीमोल झालेली जीवनं, त्यांच्या संसारांची चित्रे डोळ्यांपुढे उभी राहतात. मी जेव्हा कुठेही बोलायला उभा राहतो तेव्हा माझ्या डोळ्यांसमोर माझ्याहून बुद्धिमान पण परिस्थितीने मागे पडलेले लोक असतात. लहानपणी मी ज्या वारल्यांची पोटं खपाटीला गेलेली पाहिली आहेत, ती आजही तशीच आहेत. त्यामुळे मनाला समाधान लाभत नाही. आज भोवताली परिस्थितीच अशी आहे की संवेदनाशील मन शांत राहणे अशक्य आहे. जोपर्यंत हे वारली, ठाकुर समाधानाने, मानाने जीवन जगू शकत नाहीत तोपर्यंत या स्वातंत्र्याला काय अर्थ आहे? दलितोद्धाराच्या या तळमळीनेच मी गांधींच्याकडे ओढला गेलो. सुदैवाने मला पोतदार, दांडेकर, नारळकर, प्रा. लागू, वामनराव जोशी यांच्यासारखे आदर्श गुरू म्हणून लाभले. वामनराव जोशींनी तर 'मतापेक्षा मनाकडे पाहा' हे शिकवले. झगडा तीव्र असला तरी मनाचे स्पंदन ढळता उपयोगी नव्हे. "सत्यं ब्रूयात्। प्रियं ब्रूयात्...". याचा अर्थ सत्य कटू असेल तर बोलू नये असा नाही. तर सत्य अप्रिय असले तरी बोलावे, पण ते अप्रिय होईल असे बोलू नये हा महात्मा गांधींचा अर्थ मला पटतो. आजपर्यंत मी जिथे जिथे गेलो तिथे तिथे मला श्रोत्यांकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळाला. म्हणूनच माझी समाजावरही श्रद्धा आहे. कितीही वाईट गोष्टी घडत असल्या तरी समाजाच्या चांगुलपणावर माझा विश्वास आहे.

माझा हा गौरव–ग्रंथ म्हणजे माझ्याबद्दल असलेल्या सदिच्छा आहेत. म्हणून मी त्यांचा लीनतेने स्वीकार करतो आहे. या सदिच्छा हेच माझे भांडवल आहे. कोणत्याही गोष्टीकडे मी निर्लेप, निष्कंप वृत्तीने पाहू शकतो, हेच माझे समाधान आहे, तीच माझी वृत्ती आहे.

या देशामध्ये न्यायमूर्ती रानड्यांपासून ते थेट गांधी-नेहरूंपर्यंत केवढे मोठे थोर समाजसुधारक नेते होऊन गेले. पण इथे सुधारणा कुठे आहे ? आमचा वारली, कोळी आहे तसाच आहे. त्याची जोवर प्रगती होत नाही तोवर या महान वारशाचा काय उपयोग ? आज हा वारसा आम्हांला, आमच्या दुबळ्या हातांना पेलतो का नाही, अशी शंका येऊ लागली आहे. तरीही कापऱ्या हाताने का होईना, पण हा वारसा पेलला पाहिजे, जपला पाहिजे.

## उद्याचे नेते

अर्थात राजकारणीच याबाबतीत काही तरी करू शकतील याबद्दल माझी खात्री आहे. आम्ही विचार मांडले पाहिजेत, सतत सांगत राहिले पाहिजे. ते कुठेना कुठे तरी रुजणार हे नक्कीच. मात्र आज सगळा बुद्धिमानवर्ग एका बाजूने उदासीन आणि दुसऱ्या बाजूला क्षणिक स्वार्थाच्या मागे लागलेला दिसतो. ज्ञानाचे हे अमृतच जर विष होत असेल तर आश्रय कशाचा घ्यायचा ? श्रद्धा कशावर ठेवायची ? सध्या तालुक्या-तालुक्यांत महाविद्यालये निघत आहेत. त्यातूनच उद्याचे आमदार आणि मंत्री निर्माण होणार आहेत. त्यांच्यामध्ये चांगल्या श्रद्धा, विचार रुजले पाहिजेत. सगळ्यांवर नाही तरी त्यांतल्या दहा टक्के मुलांवर तरी त्याचे परिणाम होतील की नाही ? या श्रद्धांवर माझा विश्वास आहे.

मला आयुष्यात समाधान मिळाले तरी वैचारिकदृष्ट्या कृतार्थता मिळत नाही. ती मिळावी म्हणून काम करीत राहावे, मोह होऊ नये, बुद्धी निर्लेप राहावी, इमान सोडण्याची पाळी येऊ नये, एवढीच माझी समाजपुरुषाजवळ मागणी आहे.

सरदारांचे भाषण संपले. त्यांचा तळमळीचा आवाज कानांत घुमत होता. माधवराव पटवर्धनांनी आभार मानले आणि कार्यक्रम संपला. तो संपल्यावर व्यासपीठावर अनुपस्थिती जाणवली ती प्रा. दि. के. बेडेकरांची. सरदारांच्या या सत्कारात बेडेकरांनी काहीतरी बोलायला हवे होते.

**– अरुण बेलसरे**

।।।।। ।।।।।

## □ शापित द्रौपदी

द्रौपदीचे वर्णन करताना महाभारतकार लिहितात – " द्रौपदी सुस्वरूप असून तिचे सर्व अवयव आकर्षक होते. डोळे काळे होते, लांबट होते. अंगकांती सावळी होती. केस निळसर होते. नख लाल व टपोरी होती. भुवया रेखीव होत्या. स्तन भरदार होते." अशी ही द्रौपदी सैरंध्रीदेखील होतीच. सैरंध्री म्हणजे सौंदर्य-प्रसाधन तज्ज्ञ. केसांच्या कलात्मक रचना करणे, चित्रविचित्र माळा तयार करणे, स्लीवलेस चोळ्यांची निरनिराळी डिझाइन्स करणे वगैरे कामे तिला येत असत. महाभारतकालीन स्त्रियांची ही परंपरा अजून सुटलेली नाही. या स्त्रिया शहरांत राहतात. त्यांचे टुमदार बंगले असतात. बंगले नसले तर ओनरशिप फ्लॅट असतात. त्यांचे नवरे उच्चपदस्थ सरकारी अधिकारी असतात किंवा खाजगी कंपन्यांतून मोठे पगारदार असतात. यांच्या निवासांतून मद्याचे सायंपान घडते तेव्हा अधूनमधून या समारंभात सामील होण्याइतपत या स्त्रिया धीट असतात. 'फेमिना', 'फिल्मफेअर' असे यांचे चौफेर वाचन असते, राजकारणाविषयी या ललना उदासीन असल्या तरी मोर्चे, संप, घेराव उत्पन्न करणाऱ्या पुढाऱ्यांविषयी त्यांच्या मनात मुळीच ओलावा नसतो. आपल्या वयात येणाऱ्या मुली आपल्यासारख्याच व्हाव्या याची त्या काळजी घेतात. 'फिल्मी नाईट'सारख्या भरगच्च कार्यक्रमांना आपल्या मुलीसह त्या हजर राहतात. धर्म हा आपल्या भारतीय जीवनातून पद्धतशीरपणे नामशेष झाल्यानंतर-धर्माच्या आया-बहिणी वगैरे खुळचट कल्पनांना आता स्थान उरलेले नाही. अर्थातच या आया-बहिणींच्या अंगावर मिरवणारी लक्ष्मी ही तृषार्त नजरेने गुंड व समाज-कंटक पाहत असतात.

निवडणुकीचे स्वयंवर उभे राहिले की, या ललनांच्या मताविषयी गुंड, त्यांचा

गट उदासीन राहतो. त्यांना हे माहीत असते की 'हलक्या' माणसांच्या पक्षातल्या एखाद्या कर्णाने जरी 'लक्ष्यवेध' केला तरी या ललना त्याला निवडणुकीत कधीही माळ घालणार नाहीत. आपल्या पोटे सुटलेल्या नवऱ्याबरोबर या ललना मते देणार ती प्रतिपक्षाला.

चतुर वर्गद्रोही नेतृत्व या धुमसणाऱ्या विद्वेषाला खतपाणी घालत राहते. त्यासाठी गुंडांची मदत घ्यावी लागते. गोरगरिबांपर्यंत बिनदिक्कत पोचणारा हाच एक कर्तृत्वशाली गट त्यांच्या हाताशी असतो. नेत्यांनी ध्येयवादाचे निर्माण केलेले धुके हे या 'पराशरां'च्या वासनेला योग्य ते वातावरण उपलब्ध करते.

ज्या देशात सच्छील आणि निरागस स्त्रियांवरचे बलात्कार क्षम्य ठरतात तिथे या नटव्या बाहुल्यांचे वस्त्रहरण फारसे आक्षेपार्ह ठरणार नाही हा गुंडाचा हिशेब चुकीचा का म्हणावा? काश्मिरातील रामबान खेड्यातून सीता व सुखन या डोग्रा तरुण मुलींचे अपहरण करून त्यांच्याबरोबर गुंडांनी आळीपाळीने बलात्कार करून निके लावले, त्या गुंडांना पाठीशी घालणारा शेख अब्दुल्ला हा भारताच्या राष्ट्राध्यक्षांना खांदा द्यायला आज लायक ठरतो. परमेश्वरीची किंकाळी इथे सोयीस्करपणे गुदमरवून टाकली जाते. नोआखली आणि टिपेरा जिल्ह्यांत हजारो हिंदू स्त्रियांची अब्रू जळून खाक झाली. आणि सरहद्दीपलीकडच्या गुंडांना आपण क्षमा करून किती तरी वर्षे उलटली आहेत.

असा आपला इंडिया असताना 'रवींद्र सरोवर स्टेडियम'वर झालेल्या स्त्रियांवरील बलात्काराला किती महत्त्व द्यायचे? पंतप्रधान इंदिरा गांधी म्हणाल्या, "'रवींद्र सरोवर' घटनेसंबंधी येणारी वृत्ते ही अतिरंजित आहेत." इंदिरा गांधींनी कलकत्त्याला जावे, दुःखित स्त्रियांची कहाणी जातीने ऐकावी अशी अपेक्षा करणाऱ्यांना इंदिराजींनी चांगली चपराक दिली. उगाच अतिरंजित वृत्तांनी झोप उडवण्यात काय हो हशील आहे?

कलकत्त्यातील या अत्याचारांना बंगालमधले आघाडी सरकार आणि ज्योति बसू जबाबदार आहेत असे म्हणण्याचे या युगात धाडस तरी कसे होते कळत नाही. उन्मत्त द्रौपदीच्या वस्त्राला दुःशासनाने हात घातला तेव्हा कर्णाने असे का म्हणायचे– "दुःशासना, अरे हे तू काय करतोस? ती आपल्याला बहिणीसारखी आहे..." मग कर्णाचा थोरपणा तो काय?

कर्ण हा किती थोर माणूस होता हेच मुख्यत्वेकरून सांगण्याचा हा काळ आहे. न्यूनगंडाने पछाडलेला, अमर्याद महत्त्वाकांक्षेने ग्रासलेला आणि यामुळेच ताठर, अहंकारी झालेला माणूस म्हणजे कर्ण असे कर्णाचे वर्णन करणे हे आता 'पाप' आहे. कर्णाने दुःशासनाला दोष देताच कामा नये; कारण दुःशासनाचा पक्ष तोच कर्णाचा पक्ष आणि पक्ष हा लोकशाहीत सर्वश्रेष्ठ होय! स्वयंवरात द्रौपदीचे 'मत' न मिळाल्यामुळे क्रुद्ध झालेल्या कर्णाने 'दैवायत्तं कुले जन्ममदायत्तं तु पौरुषम्' ही

वाणी उच्चारली, तेव्हा त्याच्या ' पौरुषा 'चा हा विलक्षण अर्थ द्रौपदीला समजला नव्हता.

१९६७ सालात बंगालमध्ये ' शेतकऱ्यांचे उठाव होऊन लुटालूट, जाळपोळ, बलात्कार आणि खून यांचे एक सत्र पुरे झाले. या व्यवहाराचे प्रमुख दुःशासन हे अटकेत टाकले गेले. त्यांच्या सुदैवाने ज्योति बसू हे १९६९ मध्ये बंगालचे उप-मुख्यमंत्री व गृहमंत्री होताच त्यांनी या सर्वांना मुक्त केले. ६ एप्रिलचा समारंभ मुख्यतः या ' गोरगरिबांच्या गुंडांनी ' आखला होता. बंगाल सरकारचे अ‍ॅडव्होकेट जनरल एस्. के. आचार्य हे या समारंभाचे एक प्रमुख संयोजक होते. एक प्रमुख डावे नेते विजयकुमार बॅनर्जी यांनी समारंभाचे उद्‌घाटन केले. श्री. राम चतर्जी हे डावे कम्युनिस्ट या समारंभाचे निमंत्रक होते.

ज्या समाजातील देखण्या स्त्रिया आणि त्यांच्या अंगावरची लक्ष्मी, समाज-कंटक आणि गुंड तृषार्त मुद्रेने आजपर्यंत केवळ पाहत होते ती या निमित्ताने गुंडांच्या एकत्र हाती लागण्याची ही काही पहिलीच वेळ नव्हती. परंतु पोलीस खाते बदनाम झालेले. कार्यक्षम पोलीस अधिकारी गृहमंत्र्यांच्या भीतीने गर्भगळीत झालेले वा लाचार झालेले, बलात्कार-खून यांना माफी देणारा पक्ष राज्यारूढ झालेला. नादान, पांडव द्यूतात हरलेले अशी तर ही पहिलीच संधी होती ! ही संधी दुःशा-सनांनी साधली...याबद्दल अतिरंजित वृत्ते देऊन आकाशपाताळ एक करण्यात अर्थ नाही.

बेसुमार कथानकाच्या पार्श्वभूमीवर जवळजवळ नग्न स्त्री-देहाची फुटा-फुटाला प्रदर्शने घडविणारे हिंदी चित्रपट हे ज्या देशाचे सांस्कृतिक पोषण करीत आहेत, देशाच्या इतिहासात हिंदू स्त्रियांची परकीय आक्रमकांनी केलेली विटंबना जिथे राष्ट्रीय एकात्मतेच्या नावाखाली लपवली जात आहे, शिक्षणाचा केंद्रबिंदू समजल्या जाणाऱ्या शहरांतून तरुण मुलींची टिंगल करून अतिप्रसंग केल्याबद्दल कॉलेज विद्यार्थ्यांना जिथे सतत पकडावे लागत आहे, त्या देशातील मंडळींनी कलकत्त्यात ७-८ स्त्रियांवर अंधाराचा फायदा घेऊन बलात्कार झाल्यावरोवर-' हाय रे दैवा ! ' म्हणून हंबरडा फोडला तरी त्याला किती किंमत द्यायची याचा हिशेब, इंदिरा गांधी, भूपेश गुप्ता, ज्योति बसू यांना नसावा अशी अपेक्षा करण्यात काय बरे अर्थ आहे !

कलकत्त्यातील नटव्या ललनांना आणि त्यांच्या नवऱ्यांना जर या प्रसंगाने हे कळले की, दिल्लीतले संधिसाधू नेते-डावे वा उजवे-हे कुणीही आपल्या मदतीला संकटकाळात येऊ शकत नाहीत तर डाव्या पक्षाला होणारा बुद्धिजीवी माणसांचा उरला सुरला विरोधही नेस्तनाबूद झाल्याशिवाय राहणार नाही. दिवाणखान्यातील ज्योति बसूंचा हा द्रौपदीला इशारा आहे— " केस मोकळे सोडून हंबरडा फोडून शांततेचा भंग करू नकोस ! ' वस्त्रहरण ' ही नेहमी वस्तुस्थिती असते आणि

कृष्णाने वस्त्रे पुरविली ही थाप असते. ७२ साली पुनः स्वयंवर होईल तेव्हा " नाहं वरयामि सूतम्। " असे उन्मत्तपणे म्हणण्याची चूक करू नकोस ! "

## □ ब्रिटिशांचे हेर विनोबा भावे !

विनोबा भावे हे गांधीजींचे शिष्य होते काय ? तूर्त जे लिहिले जाते आहे त्यावरून भावी पिढ्यांची अशी समजूत होण्याचा संभव आहे. यामुळे म. गांधीजींबरोबरच विनोबा भावे यांना मोठेपणा मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आम्ही यावर संशोधन केले तेव्हा विनोबा हे ब्रिटिशांचे व पोर्तुगीजांचे हेर होते, अशी आता आमची खात्री झाली आहे. कुठेही प्रचंड सभेत या विषयावर आम्ही दोन-अडीच तास भाषण करण्यास तयार आहोत. महात्माजींनी पहिले असहकार आंदोलन उभे करण्याचे ठरवले तेव्हा हा इसम वाईला निघून गेला. तो का ? काँग्रेसने १९३२ साली गांधींच्या हाती काँग्रेसची सर्व सूत्रे दिली तेव्हा विनोबा त्या ठिकाणी का हजर नव्हते ! सर्वांत महत्त्वाचा प्रश्न हा की १९४८ साली गांधींची हत्या झाली—जगाच्या कानाकोपऱ्यांतून थोर थोर माणसे अंत्ययात्रेसाठी दिल्लीला आली. परंतु त्या वेळीदेखील हा माणूस धुळ्यालाच राहिला. अंत्यदर्शनासाठी विनोबा गेले नाहीत ते का ?

महात्माजींच्या पवित्र कार्याला या हेराने कसा कोलदांडा घालण्याचा प्रयत्न केला, हे यावरून भावी पिढीच्या लक्षात येईल.

आम्ही विनोबांचे शत्रू नाही. आमची भूमिका संशोधकाची आहे. जे जे सत्य असेल ते ते आम्ही सप्रमाण सांगणार. कटू सत्य सांगताना जर कुणाची मने दुखावणार असतील तर त्याला आमचा इलाज नाही. आमचा जन्मच बहुजन समाजासाठी आहे !

## □ कडू आणि गोड

खोजा मुसलमानांचे धर्मगुरू आगाखान यांनी नुकतीच भारताला भेट दिली व पुणे येथे असलेला 'आगाखान पॅलेस' हा गांधीजींची जन्मशताब्दी साधून मोरारजी हस्ते भारत सरकारच्या हवाली केला. आगाखानांकडून भारत सरकारला इन्कमटॅक्स, डेथ ड्युटी, वेल्थ टॅक्स असला कसलाही कर येणे असल्यास मोरारजीभाईंनी आता आगाखानांना यासाठी कसलाही त्रास देऊ नये, असेच कुणीही म्हणेल ! खानाने दगा दिला किंवा खानाची बोटे तोडली असाच इतिहास आतापर्यंत पुणे येथे घडलेला आहे, परंतु महापौर कडू असताना 'खानाने पॅलेस दिला' हे इतिहासाला लागलेले गोड वळण आहे. **—ग्यानबा**

प्रखर देशभक्ती

सूत्रबद्ध संघटना

अमोघ वक्तृत्व

देशाच्या राजकारणातले यशस्वी डावपेच

परराष्ट्र राजकारणावरील पक्की मांड

हे सर्व हिटलरपाशी होते

तरी अखेर

त्याचा पराभव का झाला ?

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

वि. ग. कानिटकर

मूल्य : पंचवीस रुपये

ट्रॅक्टर आणि बॉयलर

चंद्रशेखर मराठे

# फळबागांचा विकास

आहारशास्त्राप्रमाणे प्रत्येक व्यक्तीच्या दररोजच्या आहारात किमान २ औंस फळांचा समावेश असला पाहिजे. सध्या भारतामध्ये हे प्रमाण केवळ १ औंसच आहे. दरडोई २ औंसांचे प्रमाण गाठण्यासाठी आपल्याला १ कोटी ६२ लाख टन फळांचे उत्पादन करावे लागेल. यासाठी ५६ लाख एकर जमिनीची आवश्यकता आहे. सध्या फळबागांखाली असलेली जमीन लक्षात घेता या कामासाठी २२ लाख एकर जादा जमीन फळबागांखाली आणावी लागेल.

रकमेच्या चणचणीमुळे हे उद्दिष्ट गाठणे अशक्य आहे. चौथ्या योजनेत ११ लाख एकर जमीन फळबागांखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. त्यापैकी ३ लाख एकर जमीन डोंगराळ असून, ८ लाख एकर जमीन सपाटीवरील आहे. यामुळे ९२ लाख मेट्रिक टन फळफळावळ उपलब्ध होईल. दुसऱ्या योजनेच्या अखेरीपर्यंत २ लाख ८ हजार एकर जादा जमीन फळबागायतीखाली आणण्यात आली होती, तर तिसऱ्या योजनेच्या अखेरीपर्यंत ३ लाख ५० हजार एकर जमीन फळबागायतीखाली आणण्यात आली होती. याचबरोबर या दोन्ही योजना अनुक्रमे १ लाख ८० हजार व २ लाख एकर फळबागायत पुनरुज्जीवित (रीज्युव्हेनेट) करण्यात आली.

'अॅडव्हान्सेस् इन फ्रूट रिसर्च' या विषयावरील परिसंवादात भाग घेताना डेप्युटी कमिशनर (हॉर्टिकल्चर) युनियन मिनिस्ट्री ऑफ फूड अॅन्ड अॅग्रिकल्चर श्री. दलजितसिंग यांनी या बाबतीतील योजनांची माहिती दिली. तीनुसार प्रत्येक राज्यासाठी फळबागविकास-महामंडळ (फ्रूट डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन) स्थापन करण्यात येईल. हे महामंडळ पुढील कामे करील–(१) फळबागांची लागवड व जोपासना


करण्यासाठी एक सुसूत्र कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करणे (२) ताज्या फळांवर प्रक्रिया करून त्यांच्यापासून खाद्य-पदार्थ तयार करणे (३) फळांपासूनचे दुय्यम पदार्थ तयार करणे. (४) अंतर्गत व परकी बाजारपेठांची गरज ओळखून त्यानुसार पुरवठा करणे.

या प्रकारच्या कामासाठी खालपासून वरपर्यंत प्रशिक्षित कर्मचाऱ्यांची एक यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. यासाठी बागकामाचे शिक्षण देण्याची योजना व्यापक करण्याचा केंद्र सरकारचा विचार असून चौथ्या योजनेत दहा हजार लोकांना बागकामाचे शिक्षण देण्याचे उद्दिष्ट आहे. प्रात्यक्षिकाचे काम करणारे कर्मचारी व प्रत्यक्ष लागवड करणारे शेतकरी यांच्यासाठीही शिक्षणाच्या योजना आहेत. ५ लाख एकर जमिनीतील फळबागा अधिक उत्पादक कशा होतील, यासाठी योजना आखण्याचे आदेश राज्य सरकारांना देण्यात आले आहेत.

१९६७–६८ सालात आपण १ लाख ९३२ टन फळफळावळ व भाजीपाला निर्यात केला. फळफळावळीची जागतिक निर्यात एकूण ७ हजार दशलक्ष डॉलर्स असून त्यातील आपला हिस्सा केवळ ९ दशलक्ष डॉलर्स आहे. आपल्याकडे कित्येक फळे अशा हंगामांत होतात की, ज्या हंगामांत ती परकीय बाजारपेठांत उपलब्ध नसतात. या गोष्टीचा आपण म्हणावा तितका उपयोग करून घेतलेला नाही. त्याचप्रमाणे पश्चिम आशिया व आग्नेय आशिया येथे आपण अधिक त्वरेने माल पाठवू शकतो, याचाही अजून पुरेपूर उपयोग करण्यात आलेला नाही.

१९६७–६८ साली प्रक्रिया केलेली फळे व भाजीपाला यांचे उत्पादन ४७ हजार १८० टन होते. पैकी आपण ६ हजार १८९ टन मालाची निर्यात केली. त्याची वर्गवारी अशी : (१) रशिया–२ हजार टन (२) कुवैत–१ हजार टन (३) अन्य देश–३१८९ टन.

भारताबाहेर राहणाऱ्या भारतीयांची फळांची गरज भागविण्याचे उद्दिष्ट जरी आपण ठेवले तरी निर्यात बरीच वाढेल. चौथ्या योजनेअखेर १ लाख टन केळ्यांची निर्यात करण्याचे उद्दिष्ट आहे. पैकी ५० हजार टन केळी एकट्या जपानला जाणार आहेत. सध्या आंब्याची वार्षिक निर्यात १०५० टन आहे. चौथ्या योजनेअखेर ती वर्षाला ७५ हजार टन करण्याचा संकल्प आहे. केळी व आंबा यांच्या निर्यातीपासून चौथ्या योजनेअखेरपर्यंत ८॥ कोटी रु. चे जादा परकी चलन मिळेल. लंडनमधील एका फर्मने हिमाचल सरकारकडे १ हजार टन सफरचंदे पुरविण्याबाबत विचारणा केली असून ऑगस्टमध्ये नमुना म्हणून २० टन माल पाठवावयाचा आहे. हा नमुना पसंत पडल्यास येथील फळ उत्पादक व संशोधन यांना एक आव्हान स्वीकारावे लागेल. निर्यातीस योग्य अशा सफरचंदांच्या जातींची लागवड काळजीपूर्वक करून एकाच दर्जाचा माल सातत्याने पुरविणे व परकी बाजारपेठांचा विश्वास संपादन करणे यांवर फळ-निर्यातीचे यश अवलंबून आहे. ○



प्रयोग क्रमांक दोनशे...

दोनशे पाच... सहा... सात... आठ...
एकट्या माणसाने आपल्या हिमतीवर एवढे प्रयोग करायचे ?
तेही दर आठवड्याला कमीत कमी चौसष्ट पानांच्या एका साप्ताहिकाचे संपादन करून !
ही गोष्ट अशक्य नसली तरी कठीण आहे.
अशक्य नाही, कारण त्या माणसाने हे करून दाखवलेले आहे.
निर्माता तोच. दिग्दर्शक तोच. नटही तोच. निवेदकही तोच.

# प्रयोग क्रमांक २०८

वसु भगत

कारण, हा एकपात्री प्रयोग आहे.
श्री. पु. ल. देशपांडे यांच्या 'बटाट्याच्या चाळी' नंतर मराठी रंगभूमीवर अनेक एकपात्री प्रयोग उभे झालेत. त्यांत यशस्वी झालेत फार थोडे. बहुतेकांच्या वाट्याला अपयशच आले. व्यवहाराच्या दृष्टीने आणि कलात्मक दृष्टीनेही. स्वतः श्री. पु. ल. देशपांडे यांनाही 'बटाट्याच्या चाळी'नंतर एकपात्री प्रयोगांत फारसे यश मिळाले नाही.
मराठी रंगभूमीवर जन्माला आलेल्या अनेक एकपात्री प्रयोगांत

द्विशतक ओलांडण्याचा विक्रम फक्त एका... आणि एकाच प्रयोगाने केला.
हा एकपात्री प्रयोग म्हणजे ' एका गाढवाची कहाणी. '
आणि त्याचे पालक, चालक, मालक वगैरे सगळे काही आहेत श्री. रंगनाथ कुलकर्णी.

या ' एका गाढवाच्या कहाणी 'चा एकपात्री प्रयोग श्री. कुलकर्णी यांनी नुकताच मुंबई येथे सादर केला.

डोक्यावरच्या केसन्केस हिमशुभ्र झालेला हा ४५ वर्षांचा तरुण म्हणजे एक जिते-जागते स्वप्न आहे.
स्वप्ने पाहणारी अनेक माणसे मी पाहिली आहेत.

स्वप्नांच्या मागे धावणारी आणि स्वप्नांचे स्वप्नपण प्रत्ययाला आल्यानंतर निमूटपणे वास्तवाशी तडजोड करून जगणारी माणसे मी पाहिली आहेत.
पण, रंगनाथ कुलकर्णी या माणसाची जातकुळी या स्वप्नाळू माणसांहून वेगळी आहे.
हा माणूस स्वप्ने पाहत नाही स्वप्ने जगतो.
तो स्वप्नांच्या मागे धावत नाही. स्वप्नेच त्याच्या मागे धावतात.

एरवी, त्याच्या स्वप्नांनी एका मागोमाग एक अपयशाचे दान त्याच्या पदरात टाकले असताना तो कधीच वास्तवाशी तडजोड करून मोकळा झाला असता.

आपण बरे; आपली नोकरी बरी असा पोक्तपणाचा आणि शहाणपणाचा विचार त्याने केला असता.

पण, हा ' पोक्त ' आणि ' शहाणा ' विचार इतकी अपयशे पत्करूनही त्याच्या मनात आलेला नाही.
कारण, तो कधीच स्वप्नांच्या मागे धावलेला नाही.
स्वप्नेच त्याच्या मागे धावत आली आहेत.
स्वप्नांनी मागे धावण्याचे असे भाग्य क्वचितच कुणाच्या वाट्याला येत असते.

श्री. रंगनाथ कुलकर्णी यांच्या या भाग्याबद्दल मला जसा मत्सर वाटतो तसाच त्यांच्या आणखी एका गुणाचाही हेवा वाटतो.

गेल्या दीड पावणेदोन तपात त्यांच्या स्वप्नाने अमाप अपयश पदरात घालूनही त्यांना वैफल्याचा स्पर्श झालेला नाही. मग वैफल्यापोटी उद्भूत होणाऱ्या कडवट-पणाची गोष्ट तर दूरच राहिली.

ते कधीही कोणत्याही समव्यावसायिकाविषयी कडवटपणाने, आकसाने किंवा द्वेषाने बोलल्याचे मला आठवत नाही.
हा गुण मिळवता येत नाही. तो रक्तातच असावा लागतो.
आणि स्वप्ने ज्यांच्यामागे धावतात त्यांच्या तो रक्तात असतोच.

'तिकीट' या नावाचे नाटक लिहून त्यांनी आपल्या स्वप्नजीवनाला खरीखुरी सुरुवात केली.

तेव्हापासून त्यांचा प्रवास सारखा चालला आहे.

त्यांची नाटके पडली.

त्यांना व्यवहारात यश लाभले नाही.

कधी ती कलात्मक दृष्ट्या अपयशी ठरली.

त्या प्रपंचात अनेकदा द्रव्यहानी सोसावी लागली.

कधी कधी तर मानहानीही अनुभवावी लागली. डुढ्ढाचार्य त्यांना हसले. म्हणाले, " हा माणूस खुळा आहे."

पण, तरीही श्री. रंगनाथ कुलकर्णी थांबले नाहीत. त्यांनी मागे कधी वळून पाहिले नाही. दुढ्ढाचार्यांचे हसणे त्यांनी बिरुदासारखे मानले. हसण्यासाठी का होईना, त्यांना दखल घेणे भाग पडले. ही वस्तुस्थिती कुलकर्ण्यांनी नेमकी हेरली होती. तेवढ्या जाणिवेचा प्राणवायू त्यांच्या बुलंद फुफ्फुसांना पुरेसा होता.

श्री. कुलकर्णी यांच्या स्वप्नशीलतेची जातकुळी वेगळी असल्यामुळे या वादळी संघर्षात ते ताठ उभे राहिले. अपयशाचा माटचा त्यांना घेरून टाकत होता. पण, नव्याचे वेड काही जात नव्हते. स्वप्नांचे खरेखुरे वेड असलेले, स्वप्नांचा खराखुरा ध्यास असलेली माणसे विरळा असतात. बहुतेकांचे, आपल्याला स्वप्नांचे वेड आहे या कल्पनेचेच वेड असते. श्री. रंगनाथ कुलकर्णी यांचे वेड, ध्यास हा अस्सल होता. म्हणून तर प्रकाशनाचा व्यवसाय नसतानाही त्यांनी श्री. विजय तेंडुलकरांचे 'माणूस नावाचे बेट' हे नाटक प्रसिद्ध केले.

नट व्हायचे नसतानाही श्री. कृष्णचंद्र यांच्या गाढवाच्या आत्मकथेला मराठी रंगभूमीवर साकार केले.

श्री. कृष्णचंद्र हे उर्दूतील विख्यात कादंबरीकार आहेत. त्यांच्या लेखातील सामाजिक आशय, वास्तववादी प्रवृत्ती आणि प्रखर उपरोधगर्भता आजच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि कलाजीवनातील गोंधळ उग्रतेने व्यक्त करीत असतात. लंदन के सात रंग, दुसरी वर्फवारी से पहले, एक लडकी : हजार दीवाने, बावन पत्ते, चांदीके घाव, या कादंबऱ्यांतून त्यांनी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत माजलेला गोंधळ इतक्या उग्रतेने आणि कलात्मकतेने शब्दारलेला आहे की त्या कादंबऱ्या वाचताना मन अस्वस्थ होऊन जाते. लेखक या नात्याने आपल्यावर फार थोडी सामाजिक जबाबदारी आहे, याची जाणीव श्री. कृष्णचंद्र यांच्या ओळीओळींतून प्रत्ययाला येत असते.

अशाच सामाजिक जबाबदारीच्या जाणिवेतून श्री. रंगनाथ कुलकर्णी यांनीही ' एका गाढवाची कहाणी ' आपल्या एकपात्री प्रयोगासाठी निवडली.

दिल्लीला राहणाऱ्या रामू धोब्याला यमुनेतील मगराने गिळल्यामुळे त्याच्या बायकापोरांचे जे हाल होतात ते त्याच्या गाढवाला पाहवत नाहीत. ते कृतज्ञ गाढव आपल्या मालकाच्या कुटुंबियांना मदत मिळवून देण्यासाठी बाहेर पडते. मग त्या गाढवाला जीवनाचा जो विदारक अनुभव येतो तो या कथेत सांगितला आहे. सरकारी कचेऱ्यांतून असणारा गोंधळ, वेगवेगळ्या सामाजिक स्तरांवर वावरणाऱ्या माणसांतील अमानुष ढोंगीपणा, प्रामाणिक आणि निष्ठावंतांची होणारी परवड या साऱ्यांचे मोठे हृदयभेदक दर्शन या कथेत घडते. साऱ्या समाजात असलेले असंतुलन विलक्षण उग्र रूप घेऊन समोर येते. एखादा मोठा आर्थिक लाभ घडून यावा म्हणून पोटच्या पोरीचा गाढवाशी विवाह करून द्यायला निघालेला उद्योगपती येथे भेटतो. हातभट्टीच्या दारूची चोरटी आयात निर्यात करणारे इथे भेटतात. सट्टाजुगाररेसमध्ये पैसा मिळावा म्हणून गाढवाला देव मानणारी माणसे इथे भेटतात. खरे म्हणजे, आजच्या व्याधिग्रस्त शहरी जीवनाचे विवस्त्र दर्शन येथे घडते.

हा एकपात्री प्रयोग सादर करताना श्री. रंगनाथ कुलकर्णी यांनी श्री. कृष्णचंद्रांच्या लेखणीचे सारे गुण कटाक्षाने जपले आहेत. त्यांच्या लेखणीतला उपरोध, विखारीपणा, चुरचुरीतपणा, विनोद श्री. कुलकर्णी यांच्या निवेदनातून प्रभावीपणे प्रत्ययास येत राहतात. श्री. कुलकर्णी यांचा प्रयोग चालला असताना प्रेक्षागृहात हास्याची कारंजी उसळत राहतात. आणि असे खदखदून हसत असतानाच खोलखोल मनात कुठेतरी कळ उठत राहते. उद्विग्नता आणि विषण्णता नकळत झेपावून दशदिशा व्यापून टाकणाऱ्या धुक्यासारखी पसरत राहते. ज्या समाजात आम्ही वावरतो त्याचे आम्हांला आधीच ठाऊक असलेले स्वरूप पुन्हा नव्याने उघडे होत राहते.

खरे सांगू, मनात खोल कुठेतरी एक अपराधीपणाची भावनाही सडू लागते. ज्या समाजात आम्ही राहतो, ज्या समाजाचे आम्ही घटक आहोत, त्याचे हे स्वरूप आम्हांला कळले असूनही आम्ही काहीच कसे करत नाही ?

हे सारे मोडायला हवे. नष्ट करून टाकायला हवे. हे असंतुलन हा कॅयॉस आम्ही सहन करायला नको.

त्यासाठी काय करायचे हे सांगता येत नाही. कुणालाच ते सांगता आलेले नाही.

पण, हे सारे बदलायला हवे, हे मात्र नक्की !

' एका गाढवाच्या कहाणी 'तून मनात जागणारी ही भावना, अत्यंत मोलाची आहे.

श्री. कुलकर्णी ' एका गाढवाची कहाणी ' सांगत असताना पोटभर हसवतात. हसवता

हसवता मन जागे करतात.

कलाकृतीचे मोल ठरवायचे असते ते असे जागे करण्याच्या कलाकृतीच्या सामर्थ्यावरच.

आम्हांला जागे करायला एकटचा कुलकर्ण्यांचे प्रयत्न पुरेसे नाहीत, हे खरे आहे.

पण, म्हणून त्या प्रयत्नांचे मोल कमी होते असे नाही.

म्हणून त्यांनी असे प्रयत्न करू नयेत, असे नाही.

आपल्या या सामाजिक उत्तरदायित्वाची कुलकर्णी यांना जाणीव आहे. त्या जाणिवेपोटीच ते ही 'एका गाढवाची कहाणी' गावोगावी पोहोचवीत आहेत. शाळा, महाविद्यालये, लहानमोठ्या संस्था...कुठेही ते या कार्यक्रमासाठी जातात.

म्हणून तर श्री. रंगनाथ कुलकर्णी या माणसावर माझे प्रेम आहे.

त्यांच्या नेक स्वप्नांवर माझे प्रेम आहे.

आज त्यांची 'एका गाढवाची कहाणी' दोनशे आठ वेळा सांगून झाली आहे. ती तिसऱ्या शतकाच्या दिशेने वेगाने वाटचाल करते आहे. आणि तिने लवकरच तिसरे शतक ओलांडून चौथे शतक खिशात घातल्याची बातमी माझ्या कानांवर आली तर मला त्याचे नवल वाटणार नाही. ○



# पुरंदऱ्यांची दौलत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे २



# "रहती हो किस गली में"

दिलीप ज. मुळ

तिचा हात ढोलकीवर नाचत होता; अगदी तालातच ! तिच्या दोन्ही हातांत पायांतली घुंगरे बांधली होती. तिच्याबरोबरचा तो मुलगा गात होता. पेटीवरले सूर फिरवीत होता. दोघेही गाण्यात तन्मय झाले होते.

तिच्या हाताला स्थिरता नव्हती. ती सूरसंगम कसोशीने साधीत होती. चेहऱ्यावर घाम दवबिंदूसारखा दिसत होता, त्या उन्हात चमकत होता.

त्या गीताला आता वेग आला होता. तिच्याबरोबरच्या त्या मुलाच्या बोटांनीही पेटीवर नृत्य सुरू केले. त्याने आवाज वाढविला होता. त्याच्या चेहऱ्यावरचे घामाचे ओघळ चमकत होते, रुपेरी दिसत होते.

एवढयातही ती समोरच्या उभ्या असलेल्यांवर कटाक्ष टाकी; आणि पुन्हा एक मुरका घेऊन हाताकडे बघे, छातीकडे बघे. तिच्या चेहऱ्यावर रुळणारे ते हास्य बहारदार दिसत होते. तिचा तो मुरका, स्मित करण्याचा अभिनय एखाद्या कसलेल्या अभिनेत्रीसारखा होता.

दुपारचे ऊन तापत होते. सूर्य मध्याकडे सरकत होता. तो डांबराचा लांबवर पसरलेला रस्ता चमकत होता. काळा कुळकुळीत दिसत होता. त्याच्यावर उन्हाने नजर स्थिर राहत नव्हती. रस्त्याच्या कडेच्या दुकानांपुढे बरीच गर्दी जमली होती. गर्दीतल्या लोकांच्या अंगावरील पांढरे, तसेच रंगीत कपडे उन्हात उठावदार दिसत होते. रंग डोळयांत शिरत होते. माना हालत होत्या. त्या गर्दीतून काही दिसत नव्हते, पण मानवी आवाज मात्र येत होता, त्याला साथ मिळत होती पेटीची, घुंगरांची अन् ढोलकीच्या तालबद्ध ठेक्याची !

पायाशी सावल्या घेऊन गर्दीतला प्रत्येकजण उभा होता. रस्त्यावरच्या रस्त्याच्या-कडेला गर्दीत येऊन मिसळे. प्रत्येकाची नजर स्थिर होती. चेहऱ्यावर स्मित फुटत होते.

ढोलकीवर तिने शेवटचा हात जोरात मारला. त्याने पेटीचा शेवटचा भाता दाबला; वरच्या स्वरांवर बोटे दाबली. ते चालू असलेले गीत संपले.

" अरे ! वाहवा ! वाहवा ! वाऽऽ ! " गर्दीतल्या त्या नुकत्याच शिरून पुढे तिच्याजवळ आलेल्या काळपट चेहऱ्याच्या तेलगूने प्रशंसा केली. त्यालगत उभ्या असलेल्या सरदारजीने दाढी कुरवाळीत साथ दिली–

" क्या चीज आपने गाया है बस !" सरदारजीने मिसरूड फुटलेल्या त्या पोराची स्तुती केली.

" अरे और एक तो सुनाव. " सरदारजीने गळ घातली.

" अजी पैसे तो दे दो पहले ! बादमें गायेंगे दूसरा !" तिने लाडिक प्रेयसी-वत् मानेची हालचाल करीत म्हटले. चवचाल नेत्रपल्लवी केली, अन् स्मित करीतच एकाच पद्धतीचा मुरका घेतला.

" अरे ओ ? गाओ तो दूसरा " अकस्मात उपटलेल्या तेलगूची संमती.

पैशाच्या आशेने दोघांनी गीत सुरू केले. तिचा आवाज फारसा सुरेल नसला तरी बेसूरही नव्हता. सिनेगीतांतील मूळच्या चालीप्रमाणे ती गात होती. त्या मुलाला साथ देत होती.

ती एक तारुण्याच्या नि शशवाच्या सरहद्दीवर वावरणारी होती. चेहऱ्यावर सदैव रुळणारे ते असंमजस हास्य हेच दर्शवीत होते. गीताच्याबरोबर सरदारजी आणि तेलगू माना डोलवत होते, नेत्रांनी एकमेकांना संकेत करीत होते, मधूनच गाण्याचा एखादा शब्द तालात धरीत होते. ती हसत होती, पण सावरून घेत होती आणि तो मुलगा तिचा भाऊ वाटत होता. बोलण्याच्या पद्धतीवरून आणि वेषावरून

ते मुसलमान वाटत होते. ढोलकी वाजवताना तिच्या शरीराच्या हालचाली तेलगू व सरदारजी निरखीत होते, अनिमिष नेत्रांनी ! गीत संपले.

" वाहवा ! बहोत अच्छा गाती हो तुम ! और एक गाना गायेंगे ! अरे, हमारी फर्माईश !" त्या काळ्या तेलगूने फर्माईश केली.

" अरे बाबू ! पैसे तो निकालो ! बादमें करो फर्माईश, नहीं तो रेडिओपे सुनो प्रोग्र्याम !" इतका वेळ न राहवून त्या मुलाने विनवणीच्या स्वरांत म्हटले. पण तो हे म्हणत असताना तो काळा तेलगू तिच्याशी लाघवी बोलत होता —

" अरे ! हमारी एक फर्माईश ! तुम अच्छे गाये तो अपने तरफसे दो रुपिये !" तोच काळा तेलगू.

" पहले निकालो तो ?"

" अरे वा ! तुम गाओ पहिले !" – सरदारजी.

" कौनसा ?"– ती.

" रहते हो किस गलीमें,
क्या नाम है तुम्हारा. "

तो काळा तेलगू पिवळ्या दंतपक्ती दाखवीतच सांगत होता. त्याचा चेहरा उत्सुक होता. त्यातच वेगळ्या समाधानाचे भाव साठविले होते. डोळे विस्फारले होते, त्यातून कुचेष्टेचे अंगार बाहेर पडत होते. आठ्या पडल्या होत्या.

ती गीत आठवत होती. सरदारजी कितीतरी वेळ तिच्याकडे पाहून झाल्यावर बोलला,

" बोलो, रहते हो किस गलीमें, क्या नाम है तुम्हारा ?"

सारी गर्दी हसली. इतका वेळ स्तब्ध असलेला तो रस्ता जणू काही हसल्या-सारखा भासला. ती बावरी झाली, पण क्षणभरच ! तीही हसू लागली, अगदी लाघवी ! सारे हसणे ओसरले. त्या मुलाच्या चेहऱ्यावरचे स्मितही संपले. तिने त्याच्याकडे पाहिले.

" अच्छा, गाओ !" पेटीचा सूर धरीतच त्याने सुचविले.

तिने सुरू केले.

" रहते हो किस गलीमें,
क्या नाम है तुम्हारा......!"

" हां ! हां !! हां !!! बोल तो सही !" हाताने 'कुठं ?'चा अभिनय करीत अन् प्रश्नार्थक मुद्रा करीतच त्या तेलगूने चेष्टेच्या स्वरांत विचारले. तिने लगेच मान खाली घातली. तिचा सूर चुकला अन् तिचा भाऊ ओरडला–

" अरे ! क्या हुआ हसने को ! गाना गा ठीक !"

ती सुरळीत झाली. गीत संपले.

" अब बोलो रहती हो किस गलीमें ?" तेलगू.

" पैसे तो दो " – ती.

" तुम्हें क्या करना है ?" तिचा भाऊ गुदमरून बोलला. दोघेही एकाच वेळेस बोलले.

त्या तेलगूने दोन रुपये दिले. गर्दीतून रुपया–आठ आणे आले. सहा–सात रुपयांची कमाई झाली. दोघेही उठले. त्यांनी घाम पुसला; नि चालू लागले. उभा असलेला सरदारजी तिच्यापासून हलला नाही, अन् तेलगूसुद्धा! त्या सरदारजीचा धक्का तिला लागला.

" अजी हटो तो !" ती.

" अरी वा ! बहोत नटखट दिखती हो ! अच्छा, मेरे अड्डेपे आना नदीके किनारे !" नदीच्या काठी दारू गाळण्याचा धंदा करणारा तो ढेरीवाला सरदारजी म्हणाला.

संध्याकाळची उन्हे जमिनीवर रेंगाळू लागली. पिवळसर किरणे मातीत मिसळ लागली. मुख्य रस्ता गजबजला होता. डांबराचा रस्ता असूनही माती सूर्यकिरणांना स्पष्ट करीत होती. रस्त्याच्या बाजूने मातीतून ते दोघे चालले होते. ते दिवाळीतले दिवस होते. दिवसभरच्या कमाईचा अंदाज घेत ती दोघे नदीकाठच्या मैदानातील झोपडपट्टीजवळ उभारलेल्या आपल्या 'तात्पुरत्या' झोपड्याकडे चालली होती. रस्त्यातच ती पैसे मोजत होती, एक, दो, तीन...पाच...सात...दस ! अन् ती हसली, अगदी स्वाभाविक !

" अरे माई ! कुछ लेंगे आप " ती गळ्यातल्या ढोलकीची बाजू बदलीत नि रंगीबेरंगी कापडाचा मळका परकरवजा पायांवर रुळणारा लेंगा नीट करीत म्हणाली.

" हां लेंगे तो कुछ ! मगर क्या लेना ! कुछ गानेके किताब लेंगे, कामको आते अपने को !" असे म्हणतच तो 'त्या' पुस्तकाचे ठिकाण शोधू लागला. इतक्यात पुढून भाजलेल्या शेंगा विकणारा फेरीवाला येत होता. त्यात सिने-गीतांची पुस्तके अडकविली होती.

" अरे भैय्या, दो आनेकी फल्ली दे दो और दो आनेके किताब दो. " तो मुलगा–नईम–गळ्यातली पेटी सावरीत म्हणाला.

" कौनसी किताबें होना ?"

" दे दो 'मिलन' और 'उपकार' के !"

ती पुस्तके चाळीत अन् शेंगा खात ती दोघे चालू लागली. गावाबाहेरील आपल्या झोपडीत शिरली. त्या झोपडीच्या दूरवरच एक पत्र्याचे उभारलेले लहानसे पडवी असलेले झोपडे होते; त्यात एक विजेचा दिवा जळत असलेला त्या पलीकडच्या अंधारामुळे अधिकच स्पष्ट दिसत होता; उठून दिसत होता.

इतका वेळ त्याचा पाठलाग करून तो सरदारजी त्या पत्र्याच्या 'झोपडी'त शिरला; तो अगदी संध्याकाळच्या सातच्या सुमाराला! त्या झोपडीतून माणसांची ये-जा चाललेली अस्पष्ट दिसत होती.

तेलगू आणि सरदारजीने केलेल्या 'प्लॅन'प्रमाणे रात्री नवाच्या सुमाराला तेलगू रामय्या नईमच्या तात्पुरत्या उभारलेल्या झोपड्यापुढे आला.

"कौन रहता है इधर?" रामय्या. नईम बाहेर आला.

"अरे, तुम हो!" ओळखल्याचा भाव आणीत रामय्या पुढे म्हणाला, "अब पिक्चर को आते क्या? मैं दिखाता हूँ तुम्हें."

"कौनसा?"

"उपकार" —रामय्या.

"मगर मेरी बहन 'शहिदा' अकेली रहेगी?"

"तो क्या हुआ?" रामय्या म्हणाला, "यहाँ नजदीक झोपडी है, हमारी बुढी रहती है। कोई फिकर मत करो."

शहरातील ठाण्यातील अकराचे ठोके पडले. रेल्वेस्टेशनातल्या गाडीने वेळेवर येऊन जोरात शिट्टी दिली. सरदारजी त्या पत्र्याच्या झोपडीबाहेर आला. नईमच्या झोपडीकडे चालू लागला, अगदी दबकत पण जलद! अन् तो त्या झोपडीत शिरला. शहिदाने त्याला पाहिले आणि भीतियुक्त आश्चर्याने स्वतःला सावरून घेऊन ती उद्गारली,

"अरे, तुम और इस वक्त!"

"हाँ!" सरदारजी स्मित करीत म्हणाला.

"क्या चाहिये तुम्हें?"

"तुम!"

"मैं? और कैसे?"

"अरे मेरी जान! तूने सबेरे मेरे दिल को आग लगायी ओ बुझा दो! यह लो दस रुपिया"—

तिला सर्व काही कळले. तिने पैशाकडे पाहिले, मन विचार करू लागले—

"पैसा की शरीर?"

अन् त्या पैशाचा विजय झाला. आजपर्यंत स्वरांनी पैसा मिळविणारी शहिदा...!

सरदारजी बाहेर पडण्यास नि नईम प्रवेशण्यास एकच योग आला. सरदारजी वेगाने निघून गेला. नईमने मागे पाहिले तो केव्हाच दृष्टिआड झाला होता. नईमने आतला रंग पाहिला नि संशयग्रस्त झाला. त्या झोपडीत लहानसा दिवा मंद

जळत होता. जुनाट लाकडी पेटीवर ठेवलेल्या दिव्याची ज्योत वाऱ्याच्या झोता-बरोबर हलत होती. त्या दिव्याशेजारील दहा रुपये त्याला दिसले. त्या पेटीपुढती शहिदा पडली होती. अर्धवट चटयांच्या भिंतीवर लटकवलेले मळकट कपडे हालत होते, त्याच्याबरोबर त्यांच्या सावल्याही हलत होत्या. त्या काहीशा जीर्ण झालेल्या चटयांतील दोन–तीन छिद्रांतून कुठल्याशा विजेच्या दिव्याचा प्रकाश जमिनीवर गोलाकार पडला होता, त्या दिव्याच्या मंद प्रकाशात उठून दिसत होता.

" किसके हैं ये रुपिये ?" दहा रुपयाची ती नोट हातात घेऊन तो विचारीत होता; तेथल्या नीरव शांततेचा भंग करीत !

" अपने ! सरदारजीने दिये ! " ती.

शहिदाचा त्या चावलेला आरक्त चेहरा, दिलेली तुटक उत्तरे नि तिच्या चुरगाळलेल्या वेषाने नईमला सर्वकाही सांगितले.

" तो यह बात है !" सुस्कारा टाकीत नईम जोरात बोलला.

" क्या ?"

" फिर क्या ? समझती नहीं ? "

" क्यूं ? क्या हुआ ! दस रुपये मिले."

" क्या तेरी इज्जत की कीमत दस रुपये है ? "

" अरे भाई, पेटके लिए. " ती.

अन् नईम पुतळ्यासारखा स्थिर झाला. त्याच्या डोळ्यांत टच्कन पाणी आले. सारे भिकारी जीवन त्याच्या डोळ्यांपुढे सरकू लागले.

दुसऱ्या दिवसापासून रात्री तो बाहेर पडेनासा झाला. सरदारजी अनेक क्लृप्त्या लढवीत होता. साऱ्या निष्फळ होत होत्या. नईमने रामय्याला दरडावले. सर-दारजीला त्याच्यातर्फे पोलिसाची धमकी दिली.

माणसाच्या रक्ताला चटावलेल्या वाघाला जसे त्या रक्ताशिवाय दुसरे काही चालत नाही तशी सरदारजोची स्थिती झाली. त्याला नईमचा कोंडमारा सहन होईनासा झाला.

तिसऱ्या दिवशी संध्याकाळनंतर बराच वेळ नईम घरी आला नाही.

त्या दिवशीच रात्री दहाला सरदारजी आला. त्याने पंधरा रुपये ठेवले. यंत्रा-प्रमाणे शहिदा त्याच्या बाहुपाशात शिरली.

आता मात्र तीमुद्धा सुखावत होती; मनाने, तसेच शरीराने !

तिलाही चटक लागली होती पैशाची नि शरीरसुखाची !

रात्रभर नईम आला नाही. तिने ती रात्र सरदारजो गेल्यानंतर एकटीच काढली.

पहाटेच नईम परत घाबरलेल्या स्थितीत झोपडीच्या दाराशी शहिऽऽऽदा, शऽऽऽ हिऽऽऽ दा ऽऽऽ ओरडत आला. शहिदा उठली. ती नुकतीच शांत झोपली होती. तिने जे पाहिले ते भयंकर होते. नईम डावा हात पोटाशी धरून आणि

उजव्या हाताने तोल सावरीत दाराकडे पळण्याचा प्रयत्न करीत होता. पळण्याच्या प्रयत्नाइतका वेग येत नव्हता; तो अडखळत होता. डावा हात रक्ताने माखला होता. डाव्या हातातील बोटाच्या फटींतून रक्त बाहेर ओघळत होते; आंबरस करताना आंबा दाबल्यावर रस जसा बोटाच्या फटींतून गळावा तसा !

दाराशीच तो धाडकन् पडला. "पाऽऽणी" दीर्घ स्वरात उच्चार केला. शहिदाने त्याला मटक्यातील पाणी पाजले.

"सरदारजीने मुऽऽ झेऽऽ अंऽऽऽ अंऽऽ खऽऽ त्मऽऽ कऽऽ रऽऽ दियाऽऽऽ! " एवढेच तो अडखळत बोलला. त्याला धाप लागली. पुढे तो मनातील अंतिम काही सांगणार होता, त्याने तोंड उघडले नि पुन्हा मिटले ते कायमचे.

ती दुपारची वेळ होती. ती रस्त्यावरून चालली होती. तिचे मन आक्रंदत होते,

"शहिदा ! तूच खुनी आहेस नईमची ! त्या दिवशी रस्त्यावर गाताना सरदारजीचा हात पैशासाठी तूच धरलास. त्याच्याशी बोलताना बेतालपणे तूच लगट केलीस, केवळ पैशासाठी ! धंद्यासाठी ! अन् त्या तेलगूकडे – रामय्याकडे – तूच चवचाल कटाक्ष टाकलास. तू हसलीस. तेही बेताल नि बेधुंद ! आधी पैशासाठी करीत होतीस. नंतर तुलाही चटक लागली.


"काय मला चटक लागली अन् कसली ?" दुसरे मन.

"कसली ?" छद्मी हास्य करीत पहिले मन उत्तरले. "शरीरसुखाची ! तुला तुझ्या सौंदर्यावर धंदा करायचा होता !"

"तूच नईमची खुनी आहे आणि आता तू समाजाचे भक्ष्य आहेस."

ती तंद्रीतून जागी झाली ती पायांखाली साचलेल्या पानाच्या होणाऱ्या 'खस् खस्' आवाजाने ! एव्हाना ती कुठल्यातरी बोळीतून चालत होती. ती बोळ लांबवर पसरली होती. अतिशय गलिच्छ बोळ होती ती ! तिथल्या दुपारच्या नीरव शांततेत तिच्या कानांभोवती स्वरांचा गोंधळ चालला होता, ते स्वर होते–

"रहती हो किस गली में ! " ○






अत्तराचे शब्द

# जुन्यातून नव्याकडे

निशिकांत मिरजकर

विनोद कुलकर्णी यांचा हा पहिलाच कथासंग्रह आहे. गडद शैलीतली वर्णने, मोहक भाषा, वेधक कथात्मकता वगैरे जुन्या कथापरंपरेची वैशिष्टये आणि तीव्र नाटय, सूक्ष्म जीवनदर्शन, अनुभूतीतला वेगळेपणा वगैरे नव्या कथांनी आत्मसात केलेली वैशिष्टये या दोन्हींचे प्रयत्नशील कथालेखकाच्या लेखनावर उमटणारे ठसे येथे पाहायला सापडतात. अशा लेखकाच्या मनावर जुन्या कथांच्या कथनात्मकतेची अपार मोहिनी असते. त्यामुळे ढोबळ, स्थूल नाटय दाखविणाऱ्या घटना त्याच्या कथेत अवतरतात. इतिहास, असामान्य व्यक्ती यांचे त्याला आकर्षण असते. एक तऱ्हेचा स्वप्नाळूपणा यात असतो. मोहक वर्णनांची लुब्धता आणि हळवी आकर्षक वाक्ये लिहिण्याची हौस हा या स्वप्नाळूपणाचा परिणाम असतो. हे सगळे असते छान. त्यातून मनोरंजन खूप होते. वाचकाच्या मनात 'वाहवा'चा प्रतिध्वनी उमटतो; पण त्याच्या मनावर चरचरून कसली वेदना उमटत नाही. हुरहूर लागून राहत नाही. म्हणून कथालेखनाच्या प्रारंभी हा स्वप्नाळू आकर्षकपणा कौतुकास्पद वाटला तरी प्रयत्नशील लेखकाने तिथेच थांबायचे नसते. नव्या

नव्या जाणिवांचा, आविष्कृतींचा शोध घेत राहायचे असते. जुन्या कथापरंपरेला पकडून, नवे स्पर्श ओळखून घ्यायचे असतात.

विनोद कुलकर्णींनी असेच केले आहे. त्यामुळे कथनात्मकतेचा धागा सर्वत्र कायम राहिलेला असला तरी कथेतील नाटय ढोबळपणाकडून सूक्ष्मतेकडे वळले आहे. नाटयवस्तू आणि नाटयाविष्कार या दोन्हींतही हळूहळू सूक्ष्मता येऊ लागली आहे. असामान्य व्यक्तींच्या सामान्य नाटयापेक्षा सामान्य व्यक्तींच्या जीवनातले नेमके क्षण टिपण्याची चाणाक्षता उमटू लागली आहे. स्वप्नाळूपणाच्याऐवजी जीवनाकडे पाहण्याची सार्थ दृष्टी आलेली आहे. हे सगळे हळूहळू, नकळत झालेले आहे. एका नव्या लेखकाचे हे उमलत जाणे आहे. विकास आहे. म्हणून जुन्याच्या खुणा आणि नव्याच्या चाहुली दोन्ही येथे दिसतात. वर्णनांची हौस तशीच राहिलेली आहे. पण पुढेपुढे लेखक वर्णनात हरवलेला नाही. ती नेमकी, नीटस आणि म्हणून अधिक परिणामकारक होऊ लागलेली आहेत. हळवी आकर्षक वाक्ये लिहिण्याचा सोस ओघ बदलून उत्कट, तरल भावदर्शनाकडे अथवा विदारक जीवनदर्शनाकडे वळला आहे. अनुभूतीचा वेगळेपणा मात्र सर्वत्र सातत्याने टिकविण्याचा प्रयत्न केलेला आहे. जुन्याची सावली असलेल्या कथांमध्ये हा वेगळेपणा राजकन्यांचे अप्रतिम सौंदर्य, जुने वातावरण, स्वामी, मठ अशा गोष्टींनी आलेला आहे. तर नव्याच्या चाहुलीत संपूर्ण वेगळया स्तरांतील कथा सांगण्याचा प्रयत्न आहे. लेखकाला मी प्रयत्नशील म्हटले, ते या वेगळेपणाच्या सातत्यामुळे.

'विराणी', 'स्वामी', 'पाप' या कथा मला जुन्या मळवाटेच्या वाटतात. 'विराणी' ही कथा बृहत्कथेच्या घाटाची आहे. तीन सुरेख राजकन्या आपल्या मनोवल्लभासाठी सती जातात. पुनर्जन्मी त्या तिघी एकाच रूपाने वल्लभाशी संसार करतात. ही कथा त्या स्त्रीला एक पक्षी सांगतो. तिचे पाऊल उंबरठयाबाहेर पडू नये म्हणून जपतो. शेवटी तीही सती जाते. 'स्वामी' या कथेतील स्वामी आपल्याशी एकनिष्ठ राहणाऱ्या निष्पाप कृष्णेसाठी आश्रमाचे मानाचे पद सोडतात. 'पाप' या कथेतली सुगंधा विवाहपूर्व मातृपद टाळण्यासाठी ऑपरेशन करून घ्यायला तयार होते, पण आप्पासाहेबांच्या घरातील वास्तव्यात ऐन वेळी निर्णय बदलते व ऑपरेशनला नकार देते. यांतल्या पहिल्या दोन कथांमध्ये राजकन्या, राजपुत्र, पुनर्जन्म, स्वामी, मठ वगैरे आहेत, म्हणून त्या मला जुन्या वाटतात असे नाही; तर एकंदर तीनही कथांमध्ये केवळ ढोबळ नाटयाखेरीज दुसरे काही नाही. त्यांतले विषय आणि ते रंगविण्याची लेखकाची पद्धत यांमध्ये स्वतंत्र वैशिष्टय असे काहीही नाही किंवा त्यातले अनुभव अनेकपदरी नाहीत. सुरेख शैलीतली वर्णने आणि गोंडस शब्दांची वाक्ये यांनी कलाकुसर केली आहे इतकेच.

त्या मानाने 'सनई' ही कथा जास्त चांगली आहे. तिच्यातला अनुभव एकपदरीच आहे. पण निवेदनाला सुरुवातीपासूनच अशी काही उत्कटता आलेली आहे

की, कथा काव्यमयतेकडे वाहत गेलेली आहे. आकर्षक वर्णनांनी नि गोंडस शब्दांनी येथे मुलायम विश्रब्धतेचा प्रत्यय झुळकीसारखा आणून दिला आहे. जुन्या चाकोरीत राहूनसुद्धा कथने स्वतःचे काही उन्मेष प्रकटवले आहेत.

## समर्थ चित्रण

'जिणं', 'प्रपंच', 'माघार', 'कावळे' या कथांनी बरेचसे नवीन वळण अंगीकारले आहे. येथे वर्णने अधिक नेमकी आणि अंतरंग जाणवून देणारी झाली आहेत. "नुकतीच उमलू लागलेली शम्मो. जुईच्या फुलाचं नितळ रूप. संध्याकाळी तिला नाच शिकवायला कुणी मास्तर येई आणि तेवढ्यापुरतं तिचं अस्तित्व अत्तरासारखं घमघमत राही." ...... "वेळी अवेळी रक्त पेटून उठायचं. रात्र वखवखून अंगावर यायची. वासनेच्या काळ्या विजा अंगभर चमकायच्या." ...... "त्याची आणि आईची सावली मागच्या भिंतीला टेकून अजागळासारखी उभी राहिली." अशी काही वाक्ये पाहताच जाणवून जाते की, आकर्षकपणाचा, हळवेपणाचा सोस मागे पडून आता प्रतीतीची ओढ निर्माण झाली आहे. जे जाणवले, जाणवून द्यायचे आहे, ते ठिकठिकाणी अशा वाक्यांनी बरोबर रेखले आहे. या कथांतल्या आकृतीही विदारक आहेत. अशक्त बायकोच्या आणि मरतुकड्या पोराच्या कटकटीने पीडलेला विशू आणि दारिद्र्यात रुतलेला, बायकोच्या बाळंतपणासाठी म्हातारीच्या ट्रंकेतले एकुलते एक चांदीचे भांडे चोरणारा रघू यांच्या जिण्याच्या स्पष्ट गडद रेषा त्यात आहेत. फ्रंटवरून परतणाऱ्या, असह्य वेदना सोसणाऱ्या नि वारंवार हालअपेष्टा भोगून आतुरतेने घरी येणाऱ्या बिचाऱ्या जवानाची बायको दुसऱ्याबरोबर पळून गेल्याचे सांगणारी जहरी वास्तवता आहे आणि अभावितपणे कावळ्याच्या चोचींच्या प्रहारांचे लक्ष्य होणारी सोना आहे. हा शेवटच्या कथेतला अनुभव तर विलक्षणच वेगळा आहे. त्यातली भयप्रदीर्घता वळसेदारपणे रेखाटून लेखकाने त्याला वास्तवाच्या पातळीवरच गडदपणे चित्रित केले आहे हे विशेष. 'जिणं' व 'प्रपंच' या कथांतल्या शब्दाशब्दांतून एक भकासपणा समर्थपणे चित्रावलेला आहे, तर मनाला सुन्न करणारा अनुभव 'माघार' या कथेतून केवळ निवेदनाच्या वळणावळणाने आणून दिलेला आहे.

'वय' आणि 'रंग' या माझ्या दृष्टीने सर्वांत जास्त यशस्वी कथा. या दोन कथांत लेखक थोडे बोलतो आणि कितीतरी जाणवून देतो. या दोन्ही कथांत नाट्य, स्वभावांचे मार्मिक चित्रण, सूक्ष्म निरीक्षण, सुस्पष्ट वर्णन, मनाची चित्रमयता हे सगळे आपोआप उमटले आहे. कथेला आपोआप आकार प्राप्त झाले आहेत.

परिणामकारकता हा या सगळ्या कथांचा विशेष आहे. शेवटची 'रंग' ही कथा सोडली, तर इतर कथांत मात्र ही परिणामकारकता जीवनचित्रांच्या व अनुभूतीच्या स्वरूपापेक्षा तिच्या कथाकृतीतच जास्त अधिष्ठित असलेली दिसते. भावनेपेक्षा भावनेच्या सुंदर मांडणीला, जीवनापेक्षा त्या जीवनाच्या चित्रमयतेला,

अर्थापेक्षा शब्दाला लेखक ठिकठिकाणी जास्त भुलला आहे. 'अत्तराचे शब्द' हे पुस्तकाचे नामाभिधान त्याचेच द्योतक नसेल ना?

तथापि जीवनाची रेखीव चित्रे रेखण्याचे नि त्यांतले गडद वा विटके रंग दाखविण्याचे सामर्थ्य या कथालेखकामध्ये आहे एवढे तरी या कथांनी निश्चितपणे जाणवून दिले आहे. पहिल्यावहिल्या कथासंग्रहाचे हे यशच म्हणावयाचे. ◻

## विश्वगांधार

**श्याम शिरळाकर**

लेखक हृषिकेश येथे एके सायंकाळी फिरण्यास गेले असता वाट चुकले. तेथे अचानक एक महापुरुष ( शिवेन्द्र कन्दहारी ) लेखकाला भेटले. त्या महापुरुषाने लेखकाला नुसते 'मार्गदर्शन' केले नाही तर चार तासांच्या चर्चेत साऱ्या आयुष्याचे मार्गदर्शन केले. त्या अनुभवांच्या आधारे लेखकाने समस्त मंडळींना आयुष्याची वाट दाखविण्याचा प्रयत्न ह्या पुस्तकात केला आहे.

लेखकाने मनुष्यमात्रांचे चार विभाग पाडून त्याचे सोदाहरण विवेचन केले आहे. हृदय व-सामर्थ्य असणारा, हृदय नसून सामर्थ्य असणारा, हृदय असून सामर्थ्य नसणारा व दोन्हीही नसणारा. अशा चार श्रणींत यच्चयावत् माणसांची विभागणी केली आहे. मग प्रत्येक विभागाचे सोदाहरण विवेचन व प्रत्येकाला 'गुणसंख्या' देऊन साजेसे (?) मार्गदर्शन केले. समस्यांना आत्मोन्नतीकडे नेण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे.

उदाहरणे, गोष्टी व कित्येकदा शास्त्रीय चिकित्सा देऊन पुस्तक कंटाळवाणे न होण्याइतपत मनोरंजक केले आहे. काही गोष्टी पटण्यासारख्या असल्याने करमणुकी-खातर नजरेखालून घालावे असे हे पुस्तक आहे.

लेखकाचा सिनेसृष्टी ह्या विषयाचा व्यासंग मोठा असावा असे वाटते. फालतू हिंदी चित्रपटांतील क्षुल्लक प्रसंगावरून लेखकाने काही 'बोध' काढले आहेत. तसेच हिंदी फिल्म व हॉलिवूडमधील प्रथितयश नायक–नायिकांची उदाहरणे जागजागी विखुरली आहेत. अध्यात्म 'सोप'करण्यासाठी असली सवंग उदाहरणे कशाला ? कित्येक उदाहरणे 'पोरकटं' आहेत. विनोद अभिप्रेत नसताना वाचकाला हसू येते.

चंगेझखान, माओ-त्से-तुंग, वॉलकॉट (स्मगलर) इ. महापुरुषांच्या साहसाने लेखक भाळला आहे! 'साहसे लक्ष्मी प्रतिवसति'मधील 'साहस' या शब्दाचा अर्थ लेखकाने 'सोयीस्कर' करून वापरला आहे. धाडस, अघोर अत्याचार, दरोडेखोरी

इ. साऱ्या गोष्टी ' साहस ' म्हणून एकत्रित करायचे ' साहस ' लेखकच करू जाणे
पान १७६–१७७ वर " सीता, द्रौपदी, सावित्री, सोफिया लॉरेन, एलिझाबेथ टलर अशांसारख्या प्रखर व दिव्य स्त्रिया समोर आल्यातर त्यांना काय मानावयाचे असा प्रश्न येतो " हे विधान लेखकाची ' संस्कृती ' दर्शविते, की मनोविकृती ? सीता, द्रौपदी व सावित्री यांना पहिला क्रमांक व एलिझाबेथ टेलर, सोफिया लॉरेन, मेरिलीन मन्रो यांना दुसरा क्रमांक दिला आहे. " सोफिया लॉरेन अनिता एकबर्ग अशासारख्यांची इच्छा मनात आणा. अशा सुंदरींच्याकडे ईश्वराचा दूत पाहत नसून प्रत्यक्ष ईश्वरच पाहत असल्याने, ज्या क्षणी आपण त्यांचा दिव्य सहवास मिळवू शकाल, त्याच वेळी ईश्वराची नजर आपल्यावर आपोआपच पडेल. ईश्वर व दिव्य स्त्रीची प्राप्ती आपणांस एकाच वेळी होईल. "–म्हणजे सोफिया लॉरेन, अनिता एकबर्ग या ' दिव्य ' स्त्रियांशी ज्यांचे नित्य घनिष्ठ संबंध आले ती चित्रपट सृष्टीतील ' हीरो ' मंडळी देवपदाला पोहोचली काय ?
पान १८९ वर लेखक म्हणतो, " परंतु याहीपेक्षा पुढे जाऊन असे म्हणता येईल किंवा तेच म्हणणे सर्वस्वी बरोबर आहे, जीवनात चारित्र्य गेले तरी चालेल, परंतु साहस जाता कामा नये. साहस गेले तर मात्र सर्वस्वच गेले असे म्हणता येईल." ही विचारसरणी अध्यात्माला पोषक आहे का ?
सद्ग्रंथ-वाचनाबद्दल लेखक म्हणतो, ज्या ग्रंथांपासून काही तरी क्रिया करण्याचे सामर्थ्य उत्पन्न होते अशाच ग्रंथांचे वाचन करावे. तात्त्विक व तर्कट ग्रंथ वाचण्याच्या फंदात पडू नये. हे ग्रंथ बुद्धीला अनंत फाटे फोडतात आपल्या ध्येयाचा आपणांस विसर पाडण्यास मदत करतात. तेव्हा अशा ग्रंथांचे वाचन करून ध्येयात अडचण उत्पन्न करून घेऊ नये. "–
' विश्वगांधार ' हा ग्रंथ क्रियेचे सामर्थ्य उत्पन्न करील, असा लेखकाचा दावा आहे काय ? ○

**' अत्तराचे शब्द ' –विनोद कुलकर्णी–सारंधा प्रकाशन–मूल्य साडेतीन रुपये.**

**' विश्वगांधार ' : शिवेन्द्र कन्दहारी प्रकाशक : अशोक के. घाटपांडे, मूल्य ७ रुपये.**

# झुंड

इतर देशांत सरकारच्या नालायकपणामुळे जर का युद्धात पराभव पत्क-रावा लागला तर तिथली जनता ते सरकारच सत्तेवरून खाली खेचते. पण आपल्याकडे.........

बासष्टला जिनेव्हा येथे भरलेल्या परिषदेतला हा प्रसंग आहे. गोष्ट खरी का खोटी हे मला सांगता येणार नाही, पण चिन्यांच्या तुरुंगातून सुटून आल्यानंतर मला असे कळले की, त्या वेळी दिल्लीत अशी वदंता होती की, जिनेव्हामध्ये रशियाचे पंतप्रधान श्री. निकिता क्रुश्चेव्ह यांनी चीनचे परराष्ट्र मंत्री मार्शल चेन-यी आणि भारताचे संरक्षण मंत्री श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांना एकत्र आणले आणि आवाज चढवून श्री. निकिता क्रुश्चेव्ह त्यांना म्हणाले, "मला वाटतं की, तुम्ही दोघांनी एकत्र बसून भारत-चीन सीमातंटा निकालात काढावा. भारत-चीन यांच्यांतल्या युद्धाचे आंतरराष्ट्रीय समाजसत्तावादावर गंभीर व अनिष्ट परिणाम होतील आणि जगातल्या साम्राज्यवादी राष्ट्रांचे फावेल ! काय विचार आहे तुमचा दोघांचा ? चीन आणि भारत यांचा या बाबतींत काय मनसुबा

लेखक............. ................................ ब्रिगेडिअर जे. पी. दळवी

अनुवाद.............................................अॅडव्होकेट माधव कानिटकर

लेखांक............................................ अकरा

---

आहे ते तरी मला एकदा कळू द्या!" त्यावर चीनचे मार्शल चेन-यी म्हणाले' "क्रुश्चेव्हसाहेब! चीनला युद्ध नको आहे. भारताशी शांततापूर्ण वाटाघाटी करूनच हा प्रश्न सोडवायचा आणि कुठल्याही परिस्थितीत युद्धाच्या मार्गांनी जायचं नाही, असंच चीननं ठरवलंय!" मार्शल चेन-यी यांचे हे विचार श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांनी पंतप्रधान पंडित नेहरूंना कळवले आणि पंडितजींनी पुन्हा एकदा चुकीचे अनुमान काढून त्यांच्या मनातल्या 'चीनला युद्ध नको आहे!' या गैर-समजुतीला खत-पाणी दिले.

६२ च्या युद्धाची दुसरी सलामी चीनने दिली ती वेळ साधून आणि जागा शोधून. गलवान व्हॅली या वादग्रस्त टापूत चिन्यांनी एक प्रकार घडवून आणला. १० जुलै १९६२ ला सुमारे ३०० चिनी सैनिकांनी आपल्या ४० गुरखा-जवानांना घेरले. गलवान व्हॅली लडाखमध्ये इतकी एका बाजूला आहे की, तिथे काय प्रकार चाललाय तो नेफामध्ये कुणाला कळणारही नाही. या आपल्या ४० गुरखा जवानांना हुकूम दिला गेला की, 'कुठल्याही परिस्थितीत आपली चौकी सोडू नका.' चिन्यांनी या ४० गुरख्यांना एकदम येऊन गोळ्या घातल्या नाहीत. त्या ३०० चिन्यांनी त्यांच्या नेहमीच्या युक्त्या वापरायला सुरुवात केली. गोड गोड बोलून त्यांनी गुरख्यांना समजावले की, 'अरे! तुम्ही गुरखे म्हणजे मूळचे नेपाळी! नेपाळ आणि भारत यांचा संबंध चांगला नाही. कशाला उगाच भाडोत्री कामं करता! नेपाळमध्ये जा, तुमच्या देशावर निष्ठा ठेवा, भारताशी तुमचा काय संबंध?' १/८ गुरखाज या तुकडीतले हे ४० जवान बुद्दू नव्हते. त्यांनी चिन्यांना रोखठोक जबाब दिला की, 'आम्ही भाडोत्री माणसं नसून भारतासाठी जीव गहाण टाक-

णाऱ्या भारतीय लष्करातले जवान आहोत तुम्ही कशाला इतके पुढे येऊन बोलता आहात ?'

गुरख्यांचा हा जमालगोटा घेतल्याबरोबर चिनी पिसाळले त्यांनी गुरख्यांची निर्भर्त्सना, अपमान करून पाहिला तरी जमेना. तेव्हा चिनी सैनिकांनी मुद्द्यावरून गुद्द्यावर यायचे ठरवले आणि मग मात्र चमत्कार घडला. त्या उमद्या आणि शूर जवानांनी अलोट धैर्य दाखवून हात उगारून पुढे आलेल्या चिन्यांना सज्जड दम दिला व ३०० चिनी सैनिक परत गेले.

... भारत सरकारने या गलवान प्रकरणाचा भलताच अर्थ काढला की, ज्या अर्थी ३०० चिनी सैनिक भारतीय हद्दीत येऊन परत गेले, त्या अर्थी 'चीनला युद्ध नको आहे!' ...भारताने या प्रकाराबद्दल चीनला निषेध खलिता पाठविला. ऑक्टोबर १९६२ मध्ये गलवानवर चीनने कबजा केला...फक्त राहिल्या आठवणी!

चीन सरकारचे भारत सरकारला बुद्दू बनविण्याचे एक खास तंत्र होते. सरहद्दीवर प्रक्षोभक प्रकार घडवून आणायचा आणि लगेच शांततापूर्ण वाटाघाटी करण्यासाठी तयारी दाखवायची. ऑगस्ट १९५९ मध्ये किंझमाने आणि लोंगजू या ठिकाणी भारतीय जवानांना ढकलीत आत नेल्यानंतर भारताच्या लोकसभेत प्रक्षोभ माजला...लगेच एप्रिल १९६० मध्ये स्वत: चाऊ–एन–लाय दिल्लीत येऊन पंतप्रधान नेहरूंना भेटले आणि त्यांनी वाटाघाटींचे वातावरण निर्माण केले. भारत सरकार थंड झाले. चीन भारतावर आक्रमण करणार नाही हा आपल्या नेत्यांचा गैरसमज चीन या पद्धतीने वागून कायम करीत असे. शत्रूची गैरसमजूत करून देऊन त्याला अंधारात ठेवणे आणि आयत्या वेळी दगा देऊन त्याच्या पाठीत खंजीर मारणे हे चिन्यांचे खास तंत्र आहे. कधीकधी तर भारतीय हद्दीत घुसून चिनी सैनिक आघाडीवरची भारताची चौकी उडवून देत आणि चिनी हद्दीत परत जात. आपले मागे आलेले जवान पुन्हा पुढे जाऊन आपली चौकी होती तशी बांधत. आणि म्हणूनच बहुधा जनरल कौलचादेखील असा गैरसमज झाला असावा की, 'डिस्पाइट अवर डिफिकल्टीज.' फॉरवर्ड पॉलिसी अंमलात आणायला हरकत नाही. कारण चिनी आपल्या सरहद्दीवरच्या चौक्या उडवून देत असले तरी ते परत जातात आणि पुन्हा एकदा पुढे जाऊन आपले जवान तिथेच पुन्हा चौकी बांधतात. शेवटी चौकी तर आपलीच असते ना ?

चिन्यांनी युद्धकैदी म्हणून मला पकडून तुरुंगात ठेवले होते. एका वेगळ्या अर्थाने मी आत जाऊन सर्व काही पाहून आलेलो आहे. Show him everything असा चीन सरकारचा चिनी लष्करी अधिकाऱ्यांना हुकूम नसताना ! चीनची लढण्याची तयारी परिपूर्ण आणि पक्की होती. कशावरून ? ही घ्या मी गोळा केलेली चक्षुर्वैसत्य हकीकत:–

१. मे १९६२ च्या कितीतरी अगोदर नेफामध्ये चिन्यांनी त्यांचे गुप्त हेर घुसविले

होते. भारताच्या बाजूने आघाडीवर काय काय घटना घडताहेत याची डे-टु-डे खबर चिन्यांना हे खबरी देत होते.

२. चिन्यांच्या बाजूने आघाडीवर लढण्यासाठी अत्यंत पराक्रमी जनरल्सची निवडून नेमणूक करण्यात आली होती.

३. ज्यांचा बाप भारतीय आहे आणि आई चिनी आहे अशी अवलाद चिन्यांनी अगोदरच निर्माण करून ठेवली होती. कशासाठी ? भारताविरुद्ध खात्रीचा हेर म्हणून त्याला वापरता यावा यासाठी. त्यांना अनेक भारतीय भाषा-एवढेच नव्हे-तर बोली आणि पोटभाषा यांचे शिक्षण दिले गेले होते. त्याचा उपयोग चीनला दोन प्रकारांनी होत असे. एकतर ते भारतात घुसले तरी आपल्याला ते आपलेच वाटत. कारण भाषा आपली ! शिवाय भारतीय लष्करात जे असंख्य भाषिक मराठी-पंजाबी-मद्रासी-बंगाली असे जवान होते त्यांची बोलणी ऐकून, त्यांचे बरोबर भाषांतर चिनी भाषेत करून ते महत्त्वाची बोलणी चाऊ-एन-लायला टाकोटाक कळवीत असत.

४. तिबेटमध्ये असंख्य कॅमेरामन्स चीनने घुसविले होते. त्यांच्याजवळचे कॅमेरे इतके चांगले होते की भारतीय जवानांच्या हालचालींची ते फिल्म घेत असत. आणि चाऊ-एन-लायसकट चीनचे बडे बडे लष्करी अधिकारी पडद्यावर ती फिल्म पाहून मगच पुढची हालचाल ठरवीत.

५. चांगले तगडे घोडे जड लष्करी सामान वाहून नेण्यासाठी वापरण्यात येत होते. चिनी सैनिकाला जड सामान उचलून न्यावे लागत नसे.

६. हजारो तिबेटी स्त्री-पुरुष चिनी सैन्यासाठी हमाली करीत होते. यांना चिनी म्हणत होते लेबर बटालियन. मी तुरुंगात असताना त्यांच्यापैकी कित्येकांना




भारतीय लष्करी युनिफॉर्म अंगावर घालून इकडे तिकडे फिरत असताना मी पाहिलेले आहे.

७. चिनी कमांडर हा त्याच्या तुकडीचा सर्वाधिकारी होता. ॲडमिनिस्ट्रेशन आणि प्रॉपर चॅनल ही भानगड चिन्यांकडे नव्हती. चिनी कमांडर योग्य तो निर्णय स्वतःच घेत असे. त्याला कुठलीही हलवाहलव करताना वरती विचारावे लागत नसे.

८. युद्धकैद्यांसाठी चिन्यांनी प्रत्यक्ष युद्धापूर्वीच मोठमोठे भक्कम तुरुंग बांधून काढले होते. या तुरुंगात ३००० कैद्यांची व्यवस्थित सोय होऊ शकली असती. कैद्यांसाठी निळ्या रंगाचे गणवेष आणि अंथरूण–पांघरूण याची सोय अगोदरच करून ठेवण्यात आली होती. भारताबरोबर होणाऱ्या लढाईत किती कैदी आपण पकडू शकू, त्यांची काय सोय करायची याचादेखील विचार चिन्यांनी केला होता तर. ही कैद्यांची छावणी इतकी मोठी होती की चीनला फार मोठी लढाईच अपेक्षित होती अशी खात्री पटते.

९. थाग–ला रिजपासून अगदी जवळ Marmang या ठिकाणापर्यन्त ७–टनी भक्कम रस्ते बांधून तयार होते. थाग–ला रिज आणि तावांग या आपल्या प्रदेशाच्या बरोबर समोर आणि काही तासांच्याच अंतरावर चीनने दोन डिव्हिजन सैन्य आणि १५० तोफखाने चीनने आणून ठेवले होते.

१०. आपण काय कामासाठी आघाडीवर पाठवले गेलेलो आहोत याची त्यांना चांगलीच कल्पना होती. त्यांना अशी शिकवण दिली गेली होती की, भारताने चीनची जमीन कुरतडायला सुरुवात केलेली आहे. भारताला चिनी हद्दीत शिरू देऊ नका. मी तुरुंगात असताना मला भेटलेल्या प्रत्येक चिनी जवानाने हीच पोपटपंची मला ऐकवून दाखवली.

११. तिबेटपासून चीनपर्यंत टेलिफोनची व्यवस्था इतकी चोख होती की चिनी लष्कर किती पुढे गेलाय ते चिनी कमांडरला एका मिनिटात समजत असे.

याला म्हणतात लढाईची तयारी ! ही चीनची तयारी एखाद्या त्रयस्थ राष्ट्राच्या इसमाने नुसती पाहिली असती तरी 'भारताने चीनवर आक्रमण केले होते आणि केवळ नाइलाज म्हणून आम्हांला मुक्तिसेना पाठवावी लागली' या चीनच्या कांगाव्यातले खरे इंगित त्याच्या सहज लक्षात आले असते. चीनचे भारतावरचे आक्रमण हे पूर्वनियोजित आणि जाणूनबुजून केलेले आक्रमण होते याची ही प्रचंड तयारी म्हणजे चालतीबोलती साक्ष होती. कारण लष्करीदृष्ट्या भारत सप्टेंबर १९६२ मध्येदेखील इतका दुबळा होता की, भारत चीनवर करू म्हटले तरी आक्रमण करू शकला नसता.

आपली लष्करी तयारी कशी अपुरी होती याबद्दल आतापर्यंत मी बरेच लिहिले आहे. आता ६२ मधील युद्धाच्या पराभवाचे आणखी एक कारण सांगतो की जे वाचून तुम्ही चकीत व्हाल.

चीन अगदी दरवाज्यापर्यंत आलेला असतानादेखील परिस्थितीच्या गांभीर्याची कुणाला नीट कल्पनाच नव्हती. सप्टेंबर १९६२ मध्ये—ज्या वेळी चीनने थाग-ला विभागात प्रक्षोभक प्रकार घडवून आणला आणि लढाईची सलामी दिली त्या वेळी-देशात महत्त्वाचे निर्णय ज्यांनी घ्यायचे असतात ते नेते (लोकनियुक्त प्रतिनिधी !) हजरच नव्हते. आपले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू राष्ट्रकुल पंतप्रधान परिषदेसाठी लंडनला गेले होते. त्यांच्याबरोबर आपले अर्थमंत्री श्री. मोरारजी देसाई पण गेले होते. अर्थमंत्री लंडनहून परस्परच जागतिक बँकेच्या मीटिंगसाठी वॉशिंग्टनला गेले. चीनने सरहद्दीवर गडबड केली आहे हे माहीत असूनदेखील तावड-तोब भारतात परत यावे असे पंडित नेहरूंना वाटले नाही. नाही तर बाकीच्या राष्ट्रांच्या पंतप्रधानांकडे बघा ! त्याच्या राष्ट्राच्या सरहद्दीवर शत्रूने गडबड केली आहे एवढे काळयचीच खोटी ! ते तातडीने जगाचे उद्योग सोडून देऊन मायदेशी रवाना होतात. कदाचित असेही असू शकेल की, आपल्या इंटेलिजन्स ब्युरोने नीट चौकशी करून चिनी आक्रमणाच्या शक्यतेची अचूक माहिती पंत-प्रधानांना दिली नसेल, किंवा संरक्षणमंत्री श्री. व्ही. के. कृष्णमेनन यांनी 'सगळे काही' ठाऊक असून पंतप्रधानांना सत्य परिस्थितीच्या गांभीर्याची जाणीव करून दिली नसेल. पंडित नेहरू लंडनहून परस्पर लाओस, नायजेरिया या देशांत रवाना झाले आणि २ ऑक्टोबरला भारतात परत आले. जनमत आवरण्याचा प्रयत्न कोणी करीत नव्हते. केवळ लोक खवळलेले आहेत म्हणून चिन्यांना हुसकून देण्याचा निर्णय घेतला गेला होताच ! सैन्य सरहद्दीवर 'पाठवलेले' होते. भारतीय सरहद्दी-तून चिन्यांना हुसकून देण्यासाठी जनरल कौलची नेमणूक करून पंडितजी आनं-दाने १५ ऑक्टोबरला सिलोनला रवाना झाले. नेहरूंचा हा दुसरा दौरा हेच दर्श-वितो की, खुद्द देशाच्या पंतप्रधानांना परिस्थितीच्या गांभीर्याची कल्पना नव्हती की चिन्यांच्या हालचालीचा अचूक अंदाज नव्हता. 'चिन्यांनी आमच्या पाठीत खंजीर मारला ! आमची फसवणूक केली' या पंडित नेहरूंच्या वाक्याला ऐति-हासिक आधार नाही तो यामुळेच. संरक्षणमंत्री श्री. व्ही. के. कृष्णमेनन हे त्या वेळी युनोच्या मीटिंगसाठी अमेरिकेला जायच्या तयारीत होते. असे म्हणतात की, कृष्ण-मेननना राष्ट्रापेक्षा आन्तराष्ट्रीय क्षेत्राचे आकर्षण जास्त होते आणि म्हणूनच थाग-ला विभागात चिन्यांनी काय प्रकार केला याची खरी माहिती आपण पंतप्रधानांना दिली तर कदाचित आपल्याला अमेरिकेचा दौरा रद्द करावा लागेल या भीतीनेच त्यांनी पंतप्रधानांना खरी माहिती दिली नाही. कॅबिनेटच्या डिफेन्स कमिटीपैकी प्राईम मिनिस्टर, फायनान्स मिनिस्टर आणि डिफेन्स मिनिस्टर यांचे लक्ष भारता-पेक्षा भारताबाहेरच जास्त होते. देशाचे संरक्षणविषयक धोरण ठरवायचे असते ते कॅबिनेटच्या डिफेन्स कमिटीने. त्यातले तीन प्रमुख सदस्य भारताबाहेर !

याच संदर्भात एक गोष्ट कबूल करतो की, भारताच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना-

देखील परिस्थितीचे नीट आकलन झाले नव्हते. बडे बड लष्करी अधिकारी त्या वेळी रजेवर होते! C.G.S. (Chief of the General Staff) जनरल कौल २ ऑक्टोबरपर्यंत रजेवर होते. श्री. चेस्टर बौल्स यांना मुलाखत देताना जनरल कौल म्हणाले होते, "ऑक्टोबर १९६२ मध्ये चीन भारताबरोबर गडबड करील, असा माझा अंदाज आहे!" आणि असा गंभीर अंदाज असूनदेखील जनरल कौल तुम्ही २ ऑक्टोबरपर्यंत श्रीनगरमध्ये होतात? काय करीत होतात श्रीनगरमध्ये त्या वेळी तुम्ही? कारण युद्ध समीप आलेले असताना C.G.S. कधी रजेवर जात नाही. थाग-ला येथील गंभीर प्रकारानंतर आपली रजा रद्द करून घेऊन तुम्ही ताबडतोब ड्यूटीवर का हजर झाला नाहीत? जनरल कौलप्रमाणेच इतर अनेक जबाबदार पदावर असलेले लष्करी अधिकारीदेखील ड्यूटीवर नव्हते. माझ्या कल्पनेप्रमाणे आर्मी हेडक्वार्टरलादेखील परिस्थितीच्या गांभीर्याची कल्पना नसावी. कारण, महत्त्वाच्या लष्करी अधिकाऱ्यांना आर्मी हेडक्वार्टरला असा हुकूम देता आला असता की, 'तुमची रजा रद्द केलेली आहे. ताबडतोब कामावर हजर व्हा!' एवढेच कशाला? ८ सप्टेंबर १९६२ ला–ज्या दिवशी थाग-लामध्ये चिन्यांनी गंभीर प्रकार घडवून आणला त्या महत्त्वाच्या दिवशी–मी स्वतः रजेवर होतो. एक सिनिअर ऑफिसर आणि पायदळ तुकडी क्रमांक ७ चा कमांडर या नात्याने माझी रजा मंजूर किंवा नामंजूर करण्याचा अधिकार होता आर्मी कमांडचा. अशा परिस्थितीत माझी रजा मंजूर झाली, याचा अर्थच कमांड ला परिस्थितीचा अंदाज नव्हता.

लेफ्टनंट जनरल मनोहरसिंग G. S. O. I, 4 th Division यांना इन्फंट्री स्कूलच्या सिनियर ऑफिसर्स कोर्सचा अभ्यास करण्यासाठी त्याच वेळी पाठविण्यात आले होते आणि थाग-ला प्रकरणात भारताचा पराभव झाल्यानंतर त्यांना परत बोलविण्यात आले. याचा अर्थ 4 th Divsion लादेखील परिस्थितीचा अंदाज नव्हता. याचा सरळ आणि स्पष्ट अर्थ असा की, जगातल्या एका पहिल्या प्रतीच्या शत्रूबरोबर–की जो प्रचंड तयारीने आला होता–आपली लढण्याचीतयारी नव्हती. आपली तयारीच मुळी या गृहीत दृष्टिकोणातून चालली होती की, चीन आक्रमण करणार नाही. सरहद्दीवर थोडी गडबड चीन करतोय खरी, पण त्याला उपाय काय? तर आघाडीवर जाऊन आपले हक्क शाबीत करण्यासाठी सरहद्दीवर खुंट्या मारणे आणि चौक्या उभारणे.

१९६७ मध्ये श्री. मेनन यांनी स्पष्ट कबुलीच दिली की, 'काय करणार? १९६२ मध्ये परिस्थितीच अशी निर्माण झाली की, युद्धाशिवाय दुसरे गत्यंतरच नव्हते. (There was nothing else to do but fight) कारण एखाद्या विशिष्ट वेळी जे युद्ध आपण शक्य तोवर टाळतो ते परिस्थिती अचानक बदलली तर अटळ होऊन बसते! माननीय मेनन पुढे कबुलीजबाब देतात की, "आपल्या

संरक्षणाच्या विचाराला आवर घालणे अशक्य झाले आणि म्हणून चीनबरोबरची लढाई अटळ होऊन बसली. एखाद्याने आपल्यावर आक्रमण केले तर आपण जरूर लढले पाहिजे. मग भले आपला पराभव झाला तरी चालेल! (The war with China became unavoidable as we could not refrain from defending ourselves. In undertaking defensive operations a country can never consider the odds. If we are attacked we have to defend ourselves even if we are defeated.) यावर अधिक भाष्य नको. आक्रमक या नात्याने भारतावर कधी हल्ला करावयाचा आणि कुठे करावयाचा याचा निर्णय चिनी अगोदरच घेऊन चुकले होते. त्यांना हे ठाऊक होते की, भारतीय जवानांच्या छोटया छोटया तुकडया विखरून ठेवलेल्या आहेत. कारण त्यांनी सर्वत्र मॅकमोहन रेषेचेच संरक्षण करायचे ठरवले. तावांगमधल्या त्या जवानांनादेखील भारत सरकार रसद पोचवू शकत नाही ठीक आहे! उत्तम आहे! भारतीय जवानांना आणखी आत (?) घेऊ! एकतर थाग-ला हा प्रदेश उघडउघड वादग्रस्त टापूत आहे. तिथेच चिनी सैन्याने आधी धडक मारली पाहिजे. भारताचे जवान दोन्ही अर्थांनी मरतील. एकतर उपाशी मरतील. कारण, भारत सरकारला तावांगमध्ये त्यांना नीट पोसता येत नव्हते तर थाग-ला प्रदेशात भारत सरकार त्यांना काय पोसणार. आणि दुसरे म्हणजे असे आहेत किती भारताचे जवान? १० ? १०० ? त्यांच्याशी सामना द्यायला १ ला १०० या प्रमाणात चिनी सैन्य तयार आहे. शिवाय भारतीय जवानांची वासलात लावून झाल्यावर चीन आरडाओरडा करायला मोकळा की, पाहा! वादग्रस्त टापूत भारताने सैन्य घुसवले म्हणून चीनला मुक्तिसेना पाठवावीच लागली. चीनच्या या सापळ्यात आपण बरोबर अडकलो. आपल्या तयारीत नसलेल्या जवानांना हुकूम सुटला की, 'जा पुढे! थाग-लापर्यंत आघाडी मारून चिन्यांना रोखा. विचार करायला लागलो की, माझ्या मनाचा प्रक्षोभ वाढतो. वाटते अशी अपुऱ्या तयारीनिशी लढाई करणे हा केवळ चुकीचा निर्णयच नव्हे तर तो फौजदारी गुन्हा ठरवला गेला पाहिजे आणि या गुन्ह्याला जे कारणीभूत आहेत त्यांना शिक्षा ठोठावल्या पाहिजेत. राजकीय कीर्तीपेक्षादेखील लष्करी कीर्ती अधिक महत्त्वाची मानली गेली पाहिजे. कारण राज्यकर्ते टेंपररी असतात, राष्ट्र परमनंट असते. आणि हा साधा महत्त्वाचा विचार दृष्टिआड केला गेल्यामुळे १९६२ मध्ये आपला पराभव झाला. भारतीय लष्करी अधिकाऱ्यांना आता छाती पुढे करून चालता येत नाही. उलट त्यांच्या माना दुःखाने, शरमेने खाली झालेल्या आहेत. जोपर्यंत चीनने बळकावलेला आपला प्रदेश आपण चीनला आव्हान देऊन परत मिळवू शकत नाही तोपर्यंत जगात. तोंड दाखवायलादेखील भारतीय लष्कराला जागा नाही!...आणि मनाला असह्य यातना होतात ते हे पाहून की, बरेच

लोक ६२ च्या या पराभवाची जबाबदारी भारतीय लष्करावरच टाकतात. " चीन-बरोबर युद्ध अटळ होते ! " हे मेननसाहेबांचे म्हणणे खरे मानले तरी लढताना लढाईची महत्त्वाची तंत्रे आपण सांभाळायला नको होती ? का दुर्लक्ष केले भारत सरकारने लायक जनरलसच्या सल्ल्याकडे ? लढाईवर जायचे म्हणजे शत्रुपक्षाची माणसे मारण्यासाठी जायचे असते, आत्महत्या करण्यासाठी नव्हे... आणि खरे सांगू ? आपली जनता इतकी थंड आणि बेफिकीर आहे की, ती नको तेव्हा खवळतेच आणि हवी तेव्हा मात्र खवळतेच असे नाही, इतकी देशाची अब्रू गेली, नाचक्की झाली तरी अजून काय आहे ? जगाच्या पाठीवरच्या इतर देशांत सरकारच्या नालायकपणामुळे जर का युद्धात पराभव पत्करावा लागला – राष्ट्राची मानहानी झाली–तर तिथली जनता ते सरकारच सत्तेवरून खाली खेचते. हिटलरने मे १९४० मध्ये फ्रान्समध्ये मुसंडी मारली. ब्रिटिश पंतप्रधान श्री. चेंबरलेन यांचे चुकीचे आणि हिटलरपुढे नांगी टाकणारे मवाळ धोरणच या हिटलरच्या मस्तवालपणाला कारणीभूत आहे हे ब्रिटिश जनतेला कळल्याबरोबर ब्रिटिश जनतेने चेंबरलेनला खाली ओढले. चेंबरलेनचे सरकार गडगडले. ब्रिटिश जनतेने विरोधी पक्षांना मतदान करून चेंबरलेनला सांगितले की, " For God's sake, go ! " इतिहासात असे दाखले पुष्कळ मिळतील. अँथनी ईडनचे काय झाले ? हेच ! त्याची पॉलिसी चुकल्याबरोबर ज्यांनी निवडून देऊन ' लोकनियुक्त प्रतिनिधी ' म्हणून मानला होता त्यांनीच त्याला सत्तेवरून खाली ओढला. आणि आपल्याकडे ? जनता झोपलेली...

८ सप्टेंबर १९६२ ला चीनने थाग–ला प्रदेशात आक्रमण केले. पण तरीदेखील लढाई अशी सुरू झाली नव्हती. चिनी भारतावर तुटून पडले ते २० ऑक्टोबर १९६२ ला.

काय करीत होते चिनी या मधल्या कालखंडात ?

(क्रमशः)

From Himalayan Blunder by Brig. J. P. Dalvi.
Thacker& Co. © with the Original Publisher.

दत्तप्रसाद दाभोळकर

# नाही निर्मळ जीवन

फ्रँक बोरमन, लुई शॅपलील, नील आर्मस्ट्रॅंड या वा अशाच नावाचा कुणी एक अगदी लवकरच थेट चंद्रावर जाऊन उतरणार आहे. नावात काय आहे, तारखेत काय आहे, असे म्हणणारे आपण सारे त्या तारखेची आणि त्या नावाची अगदी आतुरतेने वाट पाहतोय. तुमच्या-माझ्या रक्ताचा, तुमच्या-माझ्या कालखंडात वावरणारा एक माणूस आपल्या डोळ्यांसमोर सरळ चंद्रावर जाऊन उतरणार! केवढी रोमहर्षक अद्‌भुत गोष्ट. मानवजातीचा केवढा विलक्षण गौरव. मानवजातीच्या या अत्युच्च गौरवाच्या क्षणी या साऱ्या कार्यक्रमात सिंहाचा वाटा उचलणाऱ्या शास्त्रज्ञांची आपणांला आठवण होईल का? कदाचित होईल, कदाचित होणारही नाही. आणि यातली कोणतीही गोष्ट घडली तरी शास्त्रज्ञांना काही फारसे सुखदुःख व्हावयाचे नाही. – कारण शास्त्रज्ञांच्या दृष्टीने चंद्रप्रवास ही गोष्ट केव्हाच इतिहासजमा झालेली आहे. चंद्रप्रवासातील अगदी बारीक सारीक तपशील अमेरिकन आणि रशियन शास्त्रज्ञांनी केव्हाच हातावेगळा केलाय. चंद्रप्रवास ही त्यांच्या दृष्टीने आता मुळी समस्याच नाही. आता ते शास्त्रज्ञ गुंतलेत दूरच्या ग्रहांवर जाण्याच्या प्रवासाची तयारी करण्यात.

हा लांबच्या ग्रहांचा प्रवास चंद्रप्रवासापेक्षा खूप वेगळा आहे. खूप किचकट आहे. अगदी साध्या साध्या गोष्टी शास्त्रज्ञांना खूप त्रास देताहेत. रशियन शास्त्रज्ञांनी या प्रवासाच्या संदर्भात मध्यंतरी केलेल्या एका प्रयोगाची माहिती तुमच्यापैकी सर्वांनी वाचली असेल. चार भावी अंतराळ वीरांना त्यांनी एका संपूर्ण हवाबंद खोलीत एक वर्ष कोंडून ठेवले होते. पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी या अंतराळ वीरांना स्वतःचे मूत्र रासायनिकरीत्या शुद्ध करून पिण्याचे पाणी म्हणून वापरावे लागे. आता या लांबच्या प्रवासात पिण्याच्या पाण्याची जर ही गोष्ट, तर आंघोळीच्या पाण्याचे काय होईल? आंघोळीच्या पाण्याचा जर असलाच काही

प्रकार असेल तर अंतराळवीर बिचारे शेवटी आंघोळीच्याच नावाने आंघोळ करतील. पण अमेरिकन शास्त्रज्ञांनी या बाबतीत अंतराळ वीरांना दिलासा दिलाय. त्यांनी त्या प्रवाशांना पाहिजे तेवढे स्वच्छ पाणी आंघोळीला देण्याचं मान्य केलंय. पण या आंघोळीत खरा प्रश्न वेगळाच आहे. अंतराळ यानात गुरुत्वाकर्षण शून्य असते. आता ज्या क्षणी गुरुत्वाकर्षण नाहीसे होते त्या क्षणी पाण्याचे काय होईल ? – त्या वेळी पाण्याचे बर्फ बनेल का त्याची वाफ होईल ? – का त्या वेळी आपण आजपर्यंत न पाहिलेल्या एखाद्या नव्या स्वरूपात पाण्याचा जन्महोईल ?



जये गुरुत्वाकर्षण शून्य आहे अशा स्नानगृहातील आंघोळ

या प्रश्नाचे उत्तर अमेरिकेच्या ' मार्टिन मॅरिशा कॉर्पोरेशन 'ने नुकतेच शोधून काढले. शून्य गुरुत्वाकर्षण असलेले एक स्नानगृह त्यांनी बनवले आहे. अमेरिकेच्या ' के. सी १३५ ' या अंतराळतळावर या स्नानगृहाची नुकतीच चाचणी घेण्यात आली. या वेळी पाणी मधासारखे किंवा काकवीसारखे दाट बनले होते. फवाऱ्यामधून उडणारे हे पाणी संपूर्ण स्नानगृहभर तरंगत होते. या पाण्याचे लहानमोठे फुगे पण बनले होते. यांतील सर्वांत मोठे फुगे दोन इंच व्यासाचे होते. अंगावर पसरलेल्या या दाट पाण्यामुळे अंतराळ वीराला मात्र खूप आराम मिळाला. ही आंघोळ संपल्यावर त्याला स्वतःचे अंग पुसण्याचाही त्रास नव्हता. स्नानगृहात

बसवलेल्या हवा खेचू शकणाऱ्या पंपाने हे पाणी पुन्हा नळामध्य खेचून घेतले. या नळात हे पाणी केवळ पाच मिनिटांत शुद्ध व स्वच्छ बनविले जाईल. आणि मग अंतराळवीर पाहिजे तेव्हा पुन्हा आंघोळ करू शकेल.

# आधुनिक ममी

मृत्युवर मात करणे, हे मानवाचे फार मोठे स्वप्न आहे. आणखी काही दशकांनी वा शतकांनी शास्त्रज्ञ मृत्यू लांबणीवर टाकतील, मेलेल्या माणसाला जिवंत करतील, वृद्ध माणसाला पुन्हा तरुण बनवू शकतील, असा आशावाद पाश्चात देशांतील अनेक लोक आज बाळगून आहेत. शास्त्रज्ञांच्यावर असा सर्वाधिक विश्वास अमेरिकेतील क्रायॉनिक सोसायटीने (शीत शरीर संस्थेने) टाकलेला आहे.

या संस्थेचे सदस्यत्व मिळवणे तसे सोपे आहे. कारण जिवंत असताना संस्थेच्या सदस्यांवर कोणतेच बंधन नसते. बंधन एकच. प्रत्येक सभासदाने एक मृत्युपत्र करून ठेवावयाचे. भली मोठी रक्कम पण मागे ठेवावयाची. त्या पैशाचा करून उपयोग तो सभासद मरण पावल्यावर त्याचे शरीर जतन करून ठेवले जाईल. शरीर जतन करून ठेवण्याची पद्धतीही शास्त्रीय आहे. या संस्थेचा सभासद मरण पावल्यावर त्याच्या शरीरातील रक्त सत्वर काढून घेतले जाते. त्या रक्ताऐवजी त्याच्या शरीरात एक

## केवळ माहितीसाठी

" अमेरिकेने आपले लक्ष आज अंतराळ आणि संरक्षण या दोन गोष्टींवर केंद्रित केले आहे. त्यामुळेच अमेरिकेत आज तंत्रज्ञांची चणचण भासते. जगभरच्या हुशार दरिद्री तरुणांना तेथे सहजपणे नोकऱ्या मिळतात " –डॉ. लॉर्ड बोडेन यांचे हे विधान तुम्ही यापूर्वीच वाचले आहे. अमेरिकेत स्थायिक होण्यासाठी जाणारे अप्रगत देशांतील तरुण मात्र आपण स्वतःच्या गुणांचा विकास करण्यासाठी अमेरिकेत जात आहोत असे सांगतात. स्वतःच्या देशात पुरेशा नोकऱ्या व योग्य वातारण नसल्याने आपण अमेरिकेत चाललो आहोत, असे ते म्हणतात. या साऱ्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी युनोने मध्यंतरी एक समिती नेमली होती. नोव्हेंबर महिन्यात त्या समितीने आपला अहवाल सादर केला आहे. त्या अहवालात त्यांनी एक खोचक प्रश्न विचारला आहे. ' जपानमध्ये खूप तंत्रज्ञ उपलब्ध आहेत. त्या मानाने जपानमध्ये नोकऱ्या खूप कमी आहेत. साधनसामग्री कमी आहे. पगार तर अमेरिकेच्या मानाने हास्यास्पद आहेत. पण तरीही जपानी तरुण अमेरिकेत जाताना आढळत नाहीत–जपानी तरुणांच्या मनात अशी कोणती गोष्ट पेरलेली आहे, की परदेशी स्थायिक होण्यासाठी जाण्याची कल्पना त्यांच्या मनात रुजूच शकत नाही ?'

थंड द्रव पदार्थ भरला जातो. साऱ्या शरीराभोवती एक तलम चांदीचे कापड गुंडाळले जाते. त्यानंतर ते शरीर एका हवाबंद पेटीत ठेवले जाते. त्या पेटीत द्रवरूप अमोनिया भरलेला असतो. एकदा हे काम झाले की, फक्त दर सहा महिन्यांनी त्या पेटीतील अमोनिया बदलणे एवढेच काम बाकी उरते. दोन वर्षांपूर्वी या संस्थेचा पहिला सन्माननीय सभासद अशा प्रकारे शीत पेटीत ठेवण्यात आला. या सभासदाचे नाव जेम्स बेडफोर्ड. हा कॅलिफोर्निया विद्यापीठात प्राध्यापक होता.

या प्रकारानंतर अमेरिकेत खूप खळबळ माजली होती. हा माथेफिरूपणा आहे, हा वेडेपणा आहे, या अशास्त्रीय गोष्टीवर सरकारने बंदी घातली पाहिजे, अशीही मागणी खूप वर्तमानपत्रांनी केली होती. पण गेल्या महिन्यात न्यूयॉर्क विद्यापीठातील चोवीस वर्षांचा एक तरुण विद्यार्थी स्टीव्हन मॅन्डेल पुन्हा अशा प्रकारे शीतगृहात ठेवण्यात आला. आपल्या मृत्युपत्रात मॅन्डेल याने आपल्या साऱ्या टीकाकारांना सणसणीत उत्तर देऊन ठेवले. तो म्हणतो, "टीकाकारांची मला मुळीच चिंता वाटत नाही. ते सारेजण चुकीच्या मार्गाने चाललेत. मला वाईट एकाच गोष्टीचं वाटतं मी ज्या वेळी जिवंत होईन त्या वेळी टीकाकार चुकले होते हे मी त्यांना समजावून देऊ शकणार नाही. कारण त्या वेळी ते बिचारे टीकाकार मात्र अस्तित्वात नसणार."

# विज्ञानाचे अधिष्ठान.....

"अशियातील अनेक अप्रगत देशांतील आणि खुद्द भारतातील शास्त्रज्ञ आज माझ्यासमोर बसलेले आहेत. विज्ञानाशिवाय आपल्या गरीब भुकेकंगाल मातृभूमीला तरणोपाय नाही हे आपण सारेजण मनोमन जाणून आहात; पण जीवनात विज्ञान स्वीकारणे ही गोष्ट तुम्ही समजता त्यापेक्षा खूप वेगळी आहे. प्रगत देशांत काय चालले आहे, पुस्तकात काय सांगितले आहे, याचा आपणांला फारसा उपयोग नाही. आपल्या राष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थितीच्या संदर्भात विज्ञान कसे वाकवावयाचे हे आपण प्रथम ठरवले पाहिजे. एक गोष्ट तर मला प्रथमच स्पष्ट करावीशी वाटते. पाश्चात्य देशांत शास्त्रज्ञांना कोणती अद्ययावत उपकरणे मिळतात, त्यांना केवढा मोठा पगार असतो, त्यांना किती स्वातंत्र्य असते, हे तुम्ही फारसे विचारात घेता कामा नये. प्रगत आणि अप्रगत देशांतील शास्त्रज्ञांत फार मोठा फरक आहे. एकतर बुद्धिमत्तेत आपल्यापैकी बहुतेकजण दुय्यम दर्जाचे आहेत. त्यांतून विज्ञान या देशाच्या प्रगतीसाठी कसे राबवावयाचे एवढेच फक्त तुम्ही ठरवावयाचे आहे.

आणि जीवनाला विज्ञानाचे अधिष्ठान देणे हे काम आपण समजता, त्यापेक्षा फार वेगळे आहे. आज आपल्यापैकी बहुतेकजण फक्त विज्ञानाची भ्रष्ट नक्कल

# अवयव बदलण्याच्या शस्त्रक्रिया

| अवयवाचे नाव | स्प्लिहा (Kidney) | यकृत (Lung) | फुपफुस (Liver) | मूत्रपिंड (Spleen) | इन्स्युलीन तयार करणारी ग्रंथी (Pancreas) | हृदय |
|---|---|---|---|---|---|---|
| पहिली शस्त्रक्रिया केव्हा झाली ? | १९६३ | १९६३ | १९६३ | १९६४ | १९६६ | १९६७ |
| आजपर्यंत झालेल्या एकूण शस्त्रक्रिया | ७ | ३५ | ११ | २००० हून अधिक | ७ | १०० हून अधिक |
| रोगी जास्तीत जास्त किती काळ जगला ? | ५ महिने | १३ महिने | १८ दिवस | १२ वर्षे | ४॥ महिने | १४ महिने |
| एक वर्षाहून अधिक काळ जगलेल्या रोग्यांची संख्या | २ | १ | — | ८०० | — | १ |

अवयव बदलणाऱ्या शस्त्रक्रियांच्या यशापयशाचा आढावा घेणारा खालील तक्ता लंडनच्या 'डेली टेलीग्राफ'ने नुकताच प्रसिद्ध केला आहे.

करीत आहेत. शक्ती [Energy] पुरवणारे एक साघन म्हणून आपण सारेजण अणुशक्तीच्या मागे आहोत. माझा अणुशक्तीला विरोध आहे, असा गैरसमज करून घेऊ नका. पण आपणा सर्वांच्याच राष्ट्रांना अणुशक्तीऐवजी सूर्यशक्ती [Solar Energy] वर चालणारी छोटी छोटी यंत्रे हवी आहेत. आपल्या आजच्या आर्थिक कुवतीला तेच परवडणारे आहे. त्यासाठी प्रारंभी फार मोठे भांडवल गुंतवावे लागणार नाही. त्या यंत्रांच्या दुरुस्तीचा खर्च फार नसेल. गावोगावचे कसबी कारागीर सहजपणे त्या यंत्रांची देखभाल करू शकतील. सूर्यशक्तीवर चालणारे पाच-दहा अश्वशक्तीचे छोटे छोटे पंप आपण शेतकऱ्यांच्या हातात दिले पाहिजेत. सूर्यशक्तीवर चालणाऱ्या छोटया छोटया शेगडया शेतकऱ्यांच्या स्वयंपाकघरात पोहोचवल्या पाहिजेत. फुकटात मिळणारी आशियातील सूर्यशक्ती आपण फुकट घालवता कामा नये. पण हे काम करण्याऐवजी आपण आज फक्त परकीय मदतीने अणुकेंद्रे उभारीत आहोत. त्यातही गंभीर गोष्ट अशी की, कालदृष्टया निरुपयोगी [Out dated] ठरलेली त्यांच्याकडची यंत्रे त्यांची मेहेरबानी म्हणून आपण आपल्या अणुकेंद्रांत बसवून घेत आहोत.

आपणा सर्वांच्याच मनात डॉलर्सबद्दल फार प्रेम आहे. डॉलर्स मिळवून देणारे हुकमी साधन म्हणून आपण सारेचजण आज काजूचे उत्पादन करू लागलो आहोत. खोटे कशाला सांगू ? माझेही गोव्यामध्ये एक काजूचे शेत होते. पण काजूचे उत्पादनही आपण समजतो त्यापेक्षा फार भयंकर गोष्ट आहे. काजूच्या रानाचा भोवतालच्या हवामानावर, पाऊसपाण्यावर वेगळा परिणाम होतो. काजूच्या बोंडांचा रस ज्या जमिनीवर पडतो त्या जमिनीवर पुढे अनेक वर्षे साधे गवतसुद्धा उगवू शकत नाही. त्यातून काजूच्या झाडाचा पुरेपूर फायदा उठवावयाचा असेल तर देशात अत्यंत प्रगत अवस्थेत पोहोचलेले रासायनिक उद्योगधंदे हवेत. काजूचे बोंड, त्याची टरफले या सर्वांतील 'फिनॉल' (Phenolic bi-product) आपण उपयोगात आणले पाहिजेत. थोडक्यात आज काजू फक्त प्रगत देशच लावू शकतील. या सर्व गोष्टी न करता आपण जर काजूचे उत्पादन करणार असलो तर ते योग्य आहे का ? सोन्याची अंडी देणारी कोंबडी सोन्याच्या लोभाने कापण्याचाच हा प्रकार आहे ! ...... जीवनाला विज्ञानाचे अधिष्ठान द्या. म्हणून तुम्हांला सांगतो, त्या वेळी या साऱ्या गोष्टी माझ्या मनात आहेत."

**[प्रख्यात भारतीय शास्त्रज्ञ कै. डॉ. डी. डी. कोसंबी यांनी आयुष्यात केलेले शेवटचे भाषण. हे भाषण त्यांनी एप्रिल १९६६ मध्ये दिल्लीला आशियायी शास्त्रज्ञांच्या परिषदेत दिले होते.]**

# भिंतीच्या वैबड्या

सुधाकर राजे

## ☐ मोठेपणाचा एकच प्याला

अमेरिकेत एखाद्या माणसाजवळ किती डॉलर आहेत अन किती मोटारी आहेत यावर आतापर्यंत वडेपणा मोजला जात होता, पण आता तेथे मोठेपणाचे एक नवीन मोजमाप आले आहे—व ते म्हणजे ज्या माणसाला जास्त अल्सर झाले असतील तो मोठा ! माणूस बडा झाला की त्याच्या काळज्या वाढतात व जितक्या काळज्या अधिक तितके अल्सर अधिक अशा अत्याधुनिक वैद्यकशास्त्रीय तत्त्वावर हे मोठेपणाचे मोजमाप आधारलेले आहे. अर्थात ज्याला फडतूस पडसेदेखील होत नाही असा माझ्यासारखा माणूस मोठा होण्याची कधीच शक्यता नाही हे ओघानेच आले.

पण अल्सरसारखे श्रीमंत दुखणे अमेरिकेत मोठेपणाचे मोजमाप म्हणून शोभत असले तरी आपल्या गरीब हिंदुस्थानात काही स्वस्त दुखणी मोठेपणाची गमके म्हणून स्वीकारायला काय हरकत आहे ? उदाहरणार्थ, ज्याला किरकोळ मलेरिया होतो तो कनिष्ठ, टायफॉइड होतो तो मध्यम अन् न्युमोनिया होतो तो श्रेष्ठ अशी सोयीस्कर वर्गवारी आपल्याकडे करता येईल. याच्या जोडीला ज्याची डोकेदुखी अवघ्या एका ॲस्प्रोने थांबते त्याच्यापेक्षा ज्याला दोन ॲनासीन लागतात तो अधिक मोठा मानला जावा. त्याचप्रमाणे खोकल्यावर पेप्सची टिचभर गोळी घेणाऱ्या माणसापेक्षा व्हिक्सची सुबक तिकोनी गोळी चघळणारा निश्चितच मोठा नाही काय ? अन सरदीवर काढा घेणारा तो क्लार्क अन इन्हेलर हुंगणारा तो ऑफिसर हा भेद तर प्रत्यक्ष परमेश्वरानेच निर्माण केला असला पाहिजे. आता अल्सरचाच आग्रह असेल तर 'पिऊन' अल्सर होतो हे सगळ्यांना माहीत आहे. तेव्हा हात-भट्टीचा अल्सर, 'कन्ट्री'चा अल्सर अन इम्पोर्टेडचा अल्सर अशी चढती भांजणी मांडायला हवी.—हो, विसरलोच, अहमदनगरच्या सरकारी अल्सरलाही योग्य ते स्थान मिळाले पाहिजे. त्यात परत 'अजंता' अल्सर अन् 'एलोरा' अल्सर असे डावे उजवे आलेच. थोडक्यात काय, लहानपण देगा देवा, चहाचा घोटच मला हवा.

## ☐ इरसाल साम्यवाद

तुम्ही 'निर्लज्ज डाकू, आंतरराष्ट्रीय घातपात्ये, विषवल्ली, रक्तपिपासू बगल-बच्चे आणि शिवराळ, विश्वासघातकी, तत्त्वशून्य फुकटे' आहात ! सबूर...ही

मी ‘ माणूस ’ च्या संपादकांना (किंवा त्यांनी मला) लिहिलेल्या पत्राची सुरुवात नाही, उसुरी नदीवर रशियन व चिनी सैनिकांची बाचाबाची झाल्यावर रशियाने चीनला पाठविलेल्या निषेध – खलित्यांतले हे शब्द आहेत ! म्हणजे आतापर्यंत कट्टर साम्यवाद माहीत होता तसा इरसाल साम्यवादही असतो हे आता माहीत झाले. तसे पाहिले तर साम्यवादी तत्त्वज्ञानांत शिव्यांना खास स्थान आहे. तेव्हा स्पेशल साम्यवादी शिव्या सोडून रशियाने सर्व जगाला समजतील अशा शिव्या वापरणे आंतरराष्ट्रीय साम्यवादाला कितपत धरून आहे ? साम्यवादी शिव्यांच्या शब्दकोशात साम्यवाद–विरोधी देशांना कोठल्या शिव्या, त्यांच्या बाजूला असणाऱ्यांना कोठल्या शिव्या अन् साम्यवादी असूनही आपल्या कारस्थानांना विरोध करणाऱ्या करंट्यांना कोठल्या शिव्या, याची पद्धतशीर वर्गवारी असताना रशियाने हा पायंडा मोडावा हे निश्चित साम्यवाद, विरोधी, भांडवलवादी अन् प्रतिक्रांतिकारी आहे. आता चीनने या गालिप्रदानाचे प्रत्युत्तर साम्यवादी पद्धतीने दिले की सामान्य पद्धतीने हे वाचायला मिळालेले नाही. पण ‘ तुर्कीका जवाब तुर्की में ’ मिळाला असणार, कारण सरकारने शिष्टाचार पाळावेत असा बूर्ज्वा सिद्धांत मांडणारा कन्फूशियस आता नेस्तनाबूद झाला असून शेलक्या शिव्यांना माओ महिमा प्राप्त झाला आहे. फक्त प्रश्न एवढाच की जो अधिक शिवराळ तो अधिक मार्क्सवादी हा आधुनिक साम्यवादाचा सिद्धांत प्रत्यक्ष मार्क्सला कितपत मान्य झाला असता ?

## ☐ फटफटी विरुद्ध फटाकडी

माली या आफ्रिकेतल्या देशातील उपवधू तरुण लग्न करण्यापेक्षा मोटारसायकल घेणे पसंत करीत आहेत, कारण बायकोपेक्षा मोटारसायकल त्यांना अधिक स्वस्त पडते असे परवा वर्तमानपत्रांत वाचले. कमाल आहे ! फटफटी अन् फटाकडी या दोघींत फटफटी अधिक पसंत करणारे अरसिक करंटे या जगात असावेत ना ? अन् बायको अधिक महाग पडते हे एक वेळ मानले तरी काही बाबतींत तरी ती फटफटीपेक्षा नक्कीच वरचढ आहे. उदाहरणार्थ, फटफटी फक्त चालताना आवाज करते, तर बायको हातपाय न हालवताही तोंड चालवू शकते. दुसरे म्हणजे फटफटी स्टार्ट करण्यासाठी जो अश्लाघ्य प्रकार करावा लागतो त्याची बायकोच्या बाबतीत आवश्यकता पडत नाही. दुसरे ‘ चल, शॉपिंगला जाऊ ’ एवढे शब्द ओझरते उच्चारले तरी ती ऑटोमॅटिकली चालायला लागते. आता एवढे खरे की कुठल्याही मेकची मोटारसायकल “ खरं सांगा गडे, मी कशी दिसते ?” असं विचारून निष्कारण खोट बोलायला लावीत नाही. ○

चौथी सचित्र आवृत्ती

□□

# राजा शिवछत्रपति

□□

ब. मो. पुरंदरे

□□

मूल्य : रुपये बेचाळीस फक्त

□□

राजहंस प्रकाशन
पुणे

१७ मे १९६९

तिचे नाव अकेमी. जपानी भाषेत त्याचा अर्थ ' सुंदर पहाट ' असा आहे. भारतीय वेषभूषेत तिला पाहिले तर उषा साठे–दाते–भिडे असे तत्सम नाव तिला सहज खपून जाईल. पाच फुटांच्या आतबाहेर उंचीची, कृश अंगकाठीची एरवी ' जपानी ' दिसणारी अकेमी इनोशिता खास भरतनाट्यम्च्या वेषभूषेत मुंबईतल्या पाटकर सभागृहाच्या रंगमंचावर आली व तिने रंगदेवतेला आणि आपल्या गुरूला नमस्कार केला, तेव्हा अस्सल भारतीय भासली. तामीळ शब्द–सुरांच्या साथीवर तिने अलारिप्पू पेश केला. जथिस्वरम्, शब्दम्, वर्णम् पाठोपाठ सादर केले आणि उपस्थित जपानी–भारतीय प्रेक्षकसमुदायाने टाळ्यांचा कडकडाट करून तिचे मनोमन कौतुक केले. वैजयंतिमालेसारख्या प्रथितयश नृत्यतारकेने हे कौतुक जाहीरपणे बोलून दाखविले.

हा सोनियाचा दिवस उजाडायला अकेमीने केवढा अट्टाहास केला होता. जपानमधल्या शिकोकू बेटावरची ही मुलगी. तिचे वडील केमिस्ट होते. त्यांना कुठलीही कला अवगत नसली तरी कलेचा ओढा असलेल्या आपल्या कन्येला त्यांनी कधी अडवले नाही. वयाच्या सातव्या वर्षापासून अकेमीने नृत्य शिकायला सुरुवात केली. किकुमी ओटावा यांच्यापाशी तिने अभिजात जपानी नृत्यकलेचे पहिले धडे घेतले. शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर ती टोकियोमधील निहो (Nihon) विद्यापीठात

अ नि ल ह वा ल दा र

# दो न ज पा नी पा व ले

दाखल झाली. नाट्यशास्त्राच्या पदवीचा अभ्यास करीत असताना तिने नृत्यशास्त्रालाच विशेष प्राधान्य दिले. या वेळी ती फुजिमा नृत्यशाळेत व हानायागी नृत्यशाळेत जपानी नृत्याचे प्रकार शिकत होती. ताकाशी वातानाबे व ताकाया एगुची यांच्या मार्गदर्शनाखाली तिने आधुनिक नृत्याचाही अभ्यास केला.

परंतु ह्या सगळ्या काळात तिला ध्यास होता भारतीय नृत्यकलेचा. लहानपणीच तिने कमला लक्ष्मणच्या नृत्याचा कार्यक्रम जपानमध्ये पाहिला होता. भारतीय नृत्यकलेचे ते तिला झालेले पहिले दर्शन. नंतर जपानमध्ये आलेल्या कुठल्याही भारतीय नृत्य-कलावंताचा कार्यक्रम तिने सहसा चुकवला नाही. जव्हेरी भगिनींच्या कलाविष्कारानेही ती प्रभावित झाली. पदवीचा अभ्यास चालू असताना तिने भारतात येण्यासाठी शिष्यवृत्ती मिळविण्याचे प्रयत्न सुरू केले. पण तिला यश येईना. सतत दोन–तीन वर्षे ती प्रयत्न करीत होती. दरम्यान तिने भारतीय अभिजात नृत्यकलेवर प्रबंध लिहून पदवी मिळवली, जपानी नृत्याचा अभ्यास जारी ठेवला.

अखेर 'इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन्स' या संस्थेने तिला भारतीय नृत्याच्या अभ्यासासाठी एक वर्षाची शिष्यवृत्ती देऊ केली व अकेमी १९६५ मध्ये भारतात आली. बडोद्याच्या महाराजा सयाजीराव विद्यापीठाच्या संगीत-नृत्य-



नाटच महाविद्यालयात तिने श्रीमती अंजली मेहेर (पूर्वाश्रमीच्या होरा) यांच्या मार्गदर्शनाखाली भरतनाटचम्‌चा अभ्यास सुरू केला. अभ्यासातल्या अकेमीच्या प्रगतीमुळे पुढे तिला भारत सरकारची सांस्कृतिक शिष्यवृत्ती मिळाली व आता तिने चार वर्षांचा पदवीचा अभ्यासक्रम पुरा केला आहे.

या चार वर्षांतले पहिले वर्ष अकेमीला फार त्रासाचे गेले. भाषा, संगीत, नृत्य-प्रकार सर्वस्वी अनोळखी. त्यात भरतनाटचम्‌सारख्या अवघड नृत्यप्रकाराला शरीराच्या लवचिक हालचाली व्हाव्यात म्हणून घ्यावी लागणारी सख्त मेहनत. हा 'पेशन्स' परदेशीयांना अवघड जात असल्याने भारतीय नृत्यकला परदेशी मंडळी सहसा आत्मसात करू शकत नाहीत. पण अकेमीने चिकाटी धरली. तिच्या गुरू श्रीमती अंजली मेहेर यांनीही नेट धरला आणि रामायणावरच्या नृत्यनाटचात अहिल्या, मारिचाच्या भूमिका थोडचा तामिळ संवादांसह करण्यापर्यंत अकेमीने मजल मारली. रंगभूमीवर नृत्यनाटचात गुजराती वाक्ये सफाईदारपणे बोलण्याची करामतही अकेमीने करून दाखवली.

या कष्टाच्या शिक्षणात भाषेच्या माध्यमाचा अकेमीला फार त्रास झाला. ती इंग्रजी, जर्मन, फ्रेंच ह्या भाषा शिकली असली तरी त्यांवर प्रभुत्व नाही. बोलायची सवय नाही. अजूनही इंग्रजीतून अभिव्यक्ती करताना तिला चटकन शब्द सापडत नाहीत. अशा वेळी अभिनय बोलका होतो. ती म्हणाली की, दोन जपानी माणसे भेटली तर आपल्या मायबोलीतच बोलतील. तुमच्या इथे मात्र इंग्रजीचे दांडगे वर्चस्व. इंग्रजी न येणाऱ्याला किंवा मोडकेतोडके बोलणाऱ्याला इथे हेटाळणीने वागवले जाते, याबद्दल तिने नापसंती व्यक्त केली.

अकेमीच्या मते जपानी आणि भारतीय नृत्यकलेच्या उगमामध्ये मूलभूतच फरक आहे. भारतीय नृत्यकला ही धार्मिक बाबींशी निगडित आहे तर जपानी नृत्यकला ही लोकांच्या मनोरंजनासाठी निर्माण झाली. सतराव्या शतकाचा काळ हा जपानमधील समृद्धीचा काळ असल्याने त्या वेळी काबुकीसारख्या नृत्यकला समृद्ध झाल्या. भारतीय नृत्यकलेमध्ये ठसठशीत भावाभिव्यक्तीला प्राधान्य आहे, तर जपानी नृत्यकलेत शक्यतो कमी हालचाली दाखविण्यावर भर दिला जातो. भारतीय नृत्यकलेतील आखीव, रेखीव बंदिशी ओलांडून जाता येत नाही. जपानी नृत्यामध्ये थोडे अधिक स्वातंत्र्य मिळते. जपानी नृत्याची लय संथ भासली तरी त्या नृत्यात शरीराला जबरदस्त लय ठेवावी लागते. जपानी नृत्यात किमोनोशिवाय लय ठेवता येत नाही–किमोनोची शिवण विशिष्ट पद्धतीने त्याचसाठी केलेली असते, हे नवे ज्ञान मला अकेमीकडून झाले. जपानी नृत्याची लयबद्धता ठेवण्यात किमोनोचा फार मोठा वाटा आहे.

भारतातल्या चार वर्षांच्या वास्तव्यात उन्हाळयाच्या सुटीमध्ये अकेमीने उडिया नृत्याचाही थोडाफार अभ्यास केला आहे. बडोदा विद्यापीठाची पदवीपरीक्षा तिने

नुकतीच दिली असून निकालाची ती उत्सुकतेने वाट पाहत आहे. पुढे शिष्यवृत्ती मिळाली तर भारतीय लोकनृत्यांचा वर्षभर अभ्यास करण्याची तिची इच्छा आहे. त्यानंतर युरोपचे भ्रमण, युरोपीय नृत्यांचा अभ्यास आणि मायभूमीला परतल्यावर भारतीय नृत्यकलेचे अध्यापन, असा तिच्या मनातला बेत आहे.

अकेमीची आई चांगली चित्रकार आहे. ती माउली आपल्या मुलीची कर्तबगारी पाहायला मुद्दाम सध्या भारतात आली आहे. भाषेची अडचण असल्याने आम्ही फक्त एकमेकांकडे पाहून हसत होतो. काय म्हणायचे होते, ते उमगत होते. मी म्हणत होतो– "अकेमी भरतनाटयम् छान नाचते !" ती बारीक आवाजातल्या हसण्यात उत्तर देत होती, "होय होय ! माझी पोर तशी गुणाची आहे."

कलाक्षेत्रात जपानमध्ये फार तीव्र स्पर्धा असल्याने एखाद्या कलावंताला सलग अर्धा तास रंगभूमी एकट्याला मिळणे मुष्कीलच आहे. म्हणून केवळ कलावंत होण्यापेक्षा अकेमी नृत्यशिक्षण देण्याचा व्यवसाय पत्करणार आहे. शिवाय तिला शिकवायला मनापासून आवडते. आज भरतनाटयम्‌ची लय साधणारी ही दोन जपानी पावले भविष्यकालात भरतनाटयम्‌चा जपानी कलावृंद खात्रीने तयार करतील. ○

---

## मला समजलेले मार्क्युज

[पृष्ठ ८ वरून]

ही गोष्ट खरी. परंतु असल्या बाह्य प्रहारांनी ही संस्कृती नाहीशी होणार नाही. उलट तिचे आस्तित्व अधिकच लांबण्याची भयावह शक्यता आहे. पण असे असले तरी हेही विसरून चालणार नाही की, संपूर्ण हताश झालेल्यांसाठीच आशेची निर्मिती झाली आहे.

प्रा. मार्क्यूज यांचे मला समजलेले विचार हे असे आहेत. पुस्तकातील सर्वच मुद्यांचा ऊहापोह येथे केलेला नाही. मुख्य सूत्राचे विवेचन करण्याचा माझ्या मते मी प्रामाणिक प्रयत्न केला आहे. त्यातूनही माझ्या स्वतःच्या मतांचा आरोप प्रा. मार्क्यूज यांच्या मतांवर केला गेला असण्याची शक्यता अगदीच नाही असे नाही. फांदीवर लोंबकळणाऱ्या माकडाने खालच्या तळ्यातील चंद्रबिंब उचलण्याचा प्रयत्न करावा असाच हा थोडासा प्रकार आहे. या लेखामुळे प्रा. मार्क्यूज यांचे पुस्तक वाचण्याची इच्छा काही लोकांना तरी व्हावी एवढाच उद्देश आणि अपेक्षा. ○

चित्रपट


# आशीर्वाद

खूप वर्षांपूर्वी केव्हा तरी 'किस्मत' नावाचे पिक्चर पाहिले. पिक्चर विसरून गेलो. लक्षात आहे तो त्यातील अशोककुमार. या नावाचे तेव्हापासून जे आकर्षण आहे ते आजपर्यन्त कायम आहे. 'किस्मत 'नंतर अनेक चित्रपट केवळ या कलावंतासाठी पाहिले. पंचवीस-तीस वर्षे पडद्यावर राहूनही ज्यांचा कंटाळा येत नाही अशा मोजक्या कलावंतांमध्ये अशोककुमार आघाडीवर आहे. वाढत्या वयाबरोबर त्याच्या भूमिकांचे स्वरूप बदलले असले, तरी अशा चित्रपटांचाही खरा नायक असतो तोच. गृहस्थी, राखी, हटे बजारे आणि आता 'आशीर्वाद' अशा चित्रपटांची उदाहरणे देता येतील.

दिग्दर्शक व संकलक म्हणून हृषिकेश मुखर्जी यांनी पूर्वीच नाव मिळवले आहे; पण आपल्या 'आशीर्वाद' या चित्रपटाची कथा-पटकथा लिहिण्याची जबाबदारीही त्यांनी स्वतःच पार पाडली आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळातील बंगालमधील एक खेडे. स्वाभाविकपणे जमीनदारी आलीच. गावचा जमीनदार जोगी ठाकूर. जमीनदारीत लक्ष न घालता गोरगरिबांत मिसळतो. त्यांच्या सुखदुःखांशी समरस होतो. जातीपातीचे भेद न मानता हरीजनांमध्ये मिळून मिसळून, त्यांच्यापैकीच बिरजू या नावाच्या वृद्धाकडून मृदंग शिकतो. जमीनदारीणबाई घरचा कारभार करीत असतात. परंपरागत जमीनदारी त्यांच्या अंगात मुरलेली असते. स्वाभाविकपणेच पतिपत्नींचे संबंध यथातथाच असतात. छोटी "बिटू" हाच त्या दोघांमधील दुवा. कट–कारस्थाने करून जमीनदारीणबाई हरीजन वस्तीला आग लावतात. संतापलेला जोगी गाव सोडून मुंबईस येतो. गरीब वस्तीत राहून सिनेमा दाखवत फिरणाऱ्या एका सोंगाड्याबरोबर बालगोपाळांचे रंजन करू लागतो. एका छोट्या छोकरीबद्दल त्याला विशेष आत्मीयता वाटत असते. दुर्दैवाने ती मुलगी मरण पावते आणि स्वतःच्या पोरीला पाहावयाच्या ओढीने ठाकूर गावी येतो. आपल्या हरीजन दोस्ताच्या मुलीला आपल्याच मुनिमाने पळवल्याचे कळल्याने तो विलक्षण संतापतो. मुनिमाचा पाठलाग करून आपल्या दोस्ताच्या मुलीला सोडवण्याच्या प्रयत्नांत त्याच्या हातून मुनिमाचा खून होतो.

ठाकूर आपला गुन्हा कोर्टात कबूल करतो. चौदा वर्षे बंदीवासाची सजा त्याला देण्यात येते. मध्यंतरीच्या काळात त्याची पत्नी मरण पावते. मुलगी नीना ही



जोगी ठाकुरच्या भूमिकेत अशोककुमार

मामाच्या देखरेखीखाली लहानाची मोठी होते. नीनाला आपल्या वडिलांनी संन्यास घेतला आहे, असे सांगण्यात येते. योगायोगाने ठाकूर आपल्या मुलीला तुरुंगातील तरुण डॉक्टरच्या सहवासात पाहतो आणि आपली ओळख न पटवता आपल्या मुलीशी बातचीत करतो. मुलीचे लग्न ठरल्याची वार्ता आणि स्वतःची शिक्षा पूर्ण झाल्याची वार्ता एकाच वेळी येते. तब्येत ढासळत असतानाही ठाकूर भिकारी होऊन नीनाला आशीर्वाद देण्यासाठी आपल्या गावी जातो. म्हातारा बिरजू अगदी शेवटच्या क्षणी ठाकूरची ओळख पटवतो. सर्व स्नेहीसोबती व लाडकी नीना, डॉक्टर यांच्या सहवासात ठाकूर जगाचा निरोप घेतो.

कथेमध्ये खलनायक नाही, उगाच चिकटवलेला महमूद–जॉनीवॉकर टाईप विनोद नाही. तरीही चित्रपट प्रभावी वाटतो तो हृषिकेश मुखर्जी यांची कलात्मक हाताळणी, अशोककुमारचा सर्वस्पर्शी अभिनय, आणि वसंत देसाई यांचे चित्रपटाचे कलात्मक मूल्य वाढवणारे पार्श्वसंगीत यांमुळे. गुलझार यांचे अकृत्रिम संवाद चित्रपटाची रंगत वाढवतात. अर्थात याचा अर्थ चित्रपट संपूर्ण निर्दोष आहे असा नव्हे. हरीजन वस्तीला आग लागल्यावर शिवनाथने–जोगी ठाकूर याने–गाव सोडून जाणे, नंतर त्याला १४ वर्षांची सजा होणे या घटनांमुळे मूळ कथा विषयाचा धागा तुटतो. त्यात ठाकूरच्या पत्नीचे निधन झाले असल्याने संघर्षाची तीव्रता कमी

होते. मध्यंतरानंतरचा भाग नेहमीच्या परिचित मार्गाने जातो. नाविन्य वाटते ते संजीव–सुमित्राचा सहजसुंदर अभिनय आणि हृषिदांची कलापूर्ण हाताळणी यांचे.

वास्तविक हा चित्रपट ब्लॅक अँड व्हाईट असता तर उपकारक ठरले असते. रंगीत छायाचित्रण नेहमीच्या 'हाय की' पद्धतीचे असल्याने विषयाला ते बाधक ठरते. रंगसंगती भडक व अकारण तेजस्वी (Bright) असल्याने छायाचित्रणाच्या संदर्भात तरी एखादा नेहमीचा 'बॉय मीट गर्ल' टाईप चित्रपट पाहत असल्याचा भास होतो. मुनिमाच्या खुनाच्या दृश्याचे चित्रीकरण चांगले असले, तरी केवळ एक कंदिल असलेल्या या जागेचा प्रकाश चुकीच्या लाईटिंगमुळे भगभगीत वाटतो. या उलट संजीव–सुमित्राची मोटरमधील प्रणय दृश्ये आणि हरीजन वस्तीच्या आगीची दृश्ये वास्तववादी वाटतात.

## तांत्रिक बाजू

तांत्रिक बाजूंपैकी सर्वांत जास्त प्रभाव वसंतराव देसाई यांच्या पार्श्वसंगीताच पडतो. त्यांनी योजलेले संगीत कथाविषयाशी समरस झाल्याने कथेला जिवंतपणा व गती येते. गाण्यांच्या चालीही मोठ्या सुंदर व वातावरणाशी मिळत्या–जुळत्या वापरल्या आहेत. अशोककुमारने स्वतःची गीते स्वतःच म्हटल्याने त्याच्या अभिनयाची लज्जत वाढली आहे. मुलांच्या गीतांच्या चाली बालगीतांना साजेशा वाटतात.

चित्रपटाच्या यशामध्ये कलावंतांचा सिंहाचा वाटा आहे. सुयोग्य पात्रयोजना आणि सर्व कलावंतांनी जीव ओतून साकार केलेल्या भूमिका यांमुळे अभिनयाच्या दृष्टिकोणातून चित्रपटाने प्रथम श्रेणीचे यश मिळवले आहे.

अशोककुमारने जोगी ठाकूरची मध्यवर्ती व्यक्तिरेखा विलक्षण तन्मयतेने साकार केली आहे. त्याच्या या भूमिकेला तो अभिनय करतो असे म्हणण्यापेक्षा तो 'भूमिका जगतो' असे म्हणणे जास्त वास्तववादी ठरेल. छोट्या मुलीशी तन्मयतेने बातचीत करणारा प्रेमळ पिता, बिरजूला गुरू मानून त्याच्याकडून मृदंग शिकणारा रसिक, बाल-गोपाळांच्या सहवासात स्वतःला विसरून जाणारा खिलाडू, वचनपूर्तीसाठी स्वतःच्या मुनिमाचा खून करणारा तत्पर कर्तव्यदक्ष स्नेही, अशा विविध भूमिकांतून त्याने दाखवलेले भावदर्शन या समर्थ कलावंताच्या ताकदीची कल्पना देते. सुमित्रा आणि संजीव यांच्यामधील प्रणय दृश्येही अतिशय मोहक, नाविन्याचा स्पर्श असलेली व वास्तववादी आहेत. छोट्या भूमिकांमध्ये हरींद्रनाथ चटोपाध्याय (बिरजू), अभिभट्टाचार्य (जेलर), वीणा (जमीनदारीण) व एस्. बनर्जी (मामा) यांचा उल्लेख करावा लागेल.

फार थोड्या हिन्दी चित्रपटांच्या संदर्भात 'अवश्य पाहा' असे रसिकांना सुचवावेसे वाटते. 'आशीर्वाद' हा अशा चित्रपटांपैकी एक आहे. **–शरद गोखले**

# तुमचे भविष्य
# आमचा अंदाज

## १७ ते २३ मे राशिभविष्य
श्री. गो. जोशी    सायनाचार्य

**मेष** : या आठवड्यातील अनन्यसाधारण ग्रहस्थितीचा आपल्या जीवनावर चांगला परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. र △ गु १७ मे, र △ ह २१ मे या अत्युत्तम ग्रहस्थितीचा लाभ क्वचितच घडतो आणि म्हणूनच तो व्यावसायिक जीवनात प्रचंड क्रांती घडवून आणू शकतो.

प्रगतीच्या नव्या वाटा याच काळापासून दृष्टिक्षेपात यायला लागतील, आजवरच्या बऱ्याचशा असफल आशाआकांक्षा येथूनच सफल व्हायची लक्षणे दिसायला लागतील. थोरांचा आशीर्वाद आणि धनिकांचे साहाय्य घेऊन आपण वाटचाल करू लागलात तर अपेक्षेबाहेर यश पदरी पाडून घेता येईल.

दि. १७–१९–२१ विशेष क्रांतीचा व लाभाचा काळ.

**वृषभ** : तुमच्या राशीत सूर्य आणि पंचमात गुरु-हर्शल. कित्येक वर्षांनंतर लाभलेली ही ग्रहस्थिती तुमचे जीवन कृतार्थ बनवील. मंगळाच्या विरोधाची क्षिती न बाळगता कार्य करू लागलात तर अलौकिक यश पदरी पडू शकेल.

शैक्षणिक क्षेत्रात, साहित्याच्या प्रांतात तुमच्या कृतीला फार महत्त्व प्राप्त होईल. या काळाचे महत्त्वच असे आहे की, सहज काही करावे आणि ते घवघवीत यश घेऊन उठावे, असा प्रत्यय पदोपदी यावा. अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल, व्यावसायिक संघर्ष मिटेल, अनपेक्षित लाभही पदरी पडतील.

दि. १७–२१–२३ या काळाची नोंद करा.

**मिथुन** : या काळातील रवि-हर्शल त्रिकोणाचा (दि. २१) तुमच्या आचार-विचारांवर प्रकर्षाने चांगला परिणाम घडेल. अनपेक्षितपणे अनंत प्रगत घटना

भराभर घडून यायला लागतील. प्रकृती, पैसा यांसंबंधीच्या विवंचना बऱ्याच प्रमाणात मिटून जातील.

बदली-बढतीचे योग स्पष्टपणे दिसू लागतील, सोयीची जागा लाभेल, वाहनांची विवंचना मिटेल, नोकरीधंद्यासाठी केलेले प्रयत्न यशस्वी ठरतील. तुमचा अनिष्ट काळ जवळ जवळ संपला असे समजण्याला हरकत नाही.

दि. २० ते २२ विशेष लाभदायक गोष्टी घडून याव्यात.

**कर्क** : एकादशात सूर्य, बुध, भाग्यस्थानी शुक्र या ग्रहांनी अनुकूल कौल दिलाच आहे. थोडाफार प्रयत्न करताच यश हसतमुखाने चालत येईल. या वर्षात तरी या काळाइतका सर्वांगाने अनुकूल काल आपणांस यापूर्वी कधीच भेटला नसेल.

व्यवसायधंद्याच्या अनेक योजना आकार घेऊ लागतील, सामाजिक क्षेत्र सर्वस्वी अनुकूल बनेल, समाजाच्या डोळ्यांत भरण्यासारखे कार्य याच वेळी करून दाखवाल. वैद्यकीय, रासायनिक क्षेत्रात सर्वोत्तम यश मिळवाल.

प्रवासामुळे यश वृद्धिगत होईल.

दि. १७–१८–२१–२२ हेच दिवस संस्मरणीय ठरतील.

**सिंह** : प्रयत्नांची शिकस्त करणाऱ्यांनाच ईश्वरीकृपेचा प्रत्यय येऊ शकतो, याचा अनुभव याच काली पदोपदी येऊ लागेल.

या काली आपण जे जे कार्य हाती घ्याल ते ते अपेक्षेबाहेर यश घेऊन उठेल. सांपत्तिक अडचणींवर प्रभावी तोडगा सापडेल, स्थगित कामे गतिमान करण्यासाठी अनेकांचे सहकार्य लाभेल. आपल्या अनेक योजना या आठवड्यापासून आकार घेऊ लागतील.

असे असूनही धावपळ, धडपड काही चुकणार नाहीच. उद्योगधंद्यांचे नवे तंत्र आचरणात आणले जाईल. आणि ते यशस्वीही ठरेल.

दि. १७ ते २१ हा काल अपेक्षासाफल्याचा ठरावा.

**कन्या** : सूर्य-बुध भाग्यस्थानी आल्यापासूनच तुमच्या कार्याचा वेग वाढू लागलेला आहे. उद्वेग, नैराश्य, माघार हे सारे आपण विसरू शकता.

दूरच्या प्रवासाचे प्रस्थान ठेवले जाईल. मंगल कार्ये अपेक्षेप्रमाणे पार पडतील.

नव्या जागेत राहावयास जाण्याचे विचार याच वेळी प्रत्यक्षात उतरावेत.

कला, सौंदर्यप्रसाधने, साहित्य यांसंबंधीच्या कार्यांना खूपच चालना मिळेल. आपल्या बऱ्याचशा आशाआकांक्षा या आठवड्यापासून सफल व्हाव्यात.

दि. १७ ते १९ सर्वोत्तम यशाचा काल.

**तूळ :** वर वर दिसण्याला या वेळचे ग्रहमान अनिष्ट असले, तरी गेल्या कित्येक दिवसांत प्रयत्नांची शिकस्त करूनही ज्या गोष्टी घडू शकल्या नाहीत त्या या वेळी फारसा प्रयत्न न करताही घडून येतील. सूर्य–हर्शल त्रिकोणाची ही किमया.

सांपत्तिक ताण एकदम कमी होईल, अडलेली सारी कामे गतिमान बनू लागतील, सहज कोणाला भेटायला जावे आणि त्याने हार्दिक सहकार्य करावे, असा प्रत्यय याच वेळी यायला लागेल; धनस्थानातील वक्री मंगळ आता तुमच्या वाटेस जाईलसे दिसत नाही.

दि. १८ ते २१ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**वृश्चिक :** हे दिवस आपणांस फारच घाईगर्दीचे जाणवतील. अनेक कामे निपटून काढण्यासाठी जिवाचे रान करावे लागेल, औद्योगिक क्षेत्रातील नव्या जबाबदाऱ्या स्वीकारून त्या यशस्वी कराव्या लागतील.

नोकरीधंद्यात प्रत्यक्ष लाभ जरी मोठ्या प्रमाणावर झाला नाही तरी त्या वेळच्या र△गु योगाचा आपणांस अनेक दृष्टींनी उपयोग करून घेता येईल. प्रतिष्ठा खूप उंचावेल, नव्या योजना हाताळाव्या लागतील. राजकीय व सामाजिक क्षेत्रांतही भरीव कार्य करून दाखवावे लागेल.

दि. २१ ते २३ फारच घाईगर्दीचे दिवस.

**धनू :** या आठवड्यातील र △ गु आणि र △ ह या ग्रहयोगांमुळे सध्याच्या अनिष्ट कालावरही आपणांस मात करता येईल. एखादे प्यादेही वजिराला कसे निष्प्रभ करू शकते याचा प्रत्यय याच काळी घेता येईल.

याचा अर्थ संपूर्ण स्वास्थ्याचे दिवस आहेत असा करू नका. निर्धार, निष्ठा आणि अविरत प्रयत्न यांचीही गरज या वेळी आपणांस भासेलच.

नोकरीधंद्यात सर्वत्र आशादयक वातावरण दिसू लागेल. प्रखर विरोधही मोडून पडेल, प्रगतीचा मार्ग निर्वेध, निष्कंटक दिसू लागेल.

दि. १७–२१–२२ अपेक्षित यश पदरी पडावे.

**मकर :** या आठवड्यातील आत्यंतिक शुभयोगाचा अधिकाधिक लाभ तुम्हा मकरराशी व्यक्तींनाच व्हावा. प्रामुख्याने दि. १७ ते २१ च्या सुमारास अनपेक्षितपणे तुमच्या जीवनाचा ओघ बदलेल. आणि ही बदलती अवस्था आपणांस सर्वांगाने प्रगतीची ठरेल.

सांसारिक, सांपत्तिक, साऱ्या अपेक्षा या काली पूर्णांशाने सफल व्हाव्यात. अंगीकृत व्यवसायात चार पावले पुढे सरकाल. नव्या कल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरवाल.

साहित्य, विज्ञान, कला याबाबतींत तर तुमचा कोणीही हात धरू शकेल, असे मला वाटत नाही.

दि. १७–१९–२१–२३ हे दिवस नोंद करण्यासारखे महत्त्वाचे आहेत.

**कुंभ** : कुंभ राशीचे आधिपत्य हर्शलकडे येते आणि त्याच्याशी सूर्याचा अंशपूर्ण त्रिकोण घडताच (दि. २१) आपली सारी कामे गती घेऊ लागतील. भंगलेल्या आकांक्षा पूर्णांशाने सांधल्या जातील. येथूनच आपल्या चारित्र्याला, व्यवसायधंद्याला एक वेगळेच चांगले वळण लाभेल.

हे एक क्रांतीचे पर्व आपल्या जीवनात सुरू होत आहे. व्यवसायधंद्याचे स्वरूप पालटेल, नोकरीधंद्यात नवे तंत्र अंमलात आणले जाईल, प्रगतीकडे वाटचाल सुरू होईल. आपणांस अनेक मंगल कार्यांत भाग घ्यावा लागेल.

दि. २० ते २३ या कालावर लक्ष केंद्रित करा.

**मीन** : सूर्य पराक्रमात आणि त्याचा गुरु–हर्शलशी त्रिकोण. ही स्थिती अशी आहे की, आपण कोणत्याही क्षेत्रात प्रतिज्ञेने यश मिळवू शकाल.

नाट्य, चित्रपट, कला ही तर आपली खास क्षेत्रे. यांत आजवर कधी न मिळालेले यश या वेळी पदरी मिळेल.

धार्मिक-कौटुंबिक हेतूने प्रवास घडेल. नवी जागा लाभेल, वाहनांचा प्रश्नही सुटेल, तुम्हांपैकी काहींना परदेशासही जाण्याची संधी मिळावी. आपल्या बऱ्याचशा योजना या आठवड्यापासून गती घेऊ लागतील.

दि. १७–१९–२१ विशेष लक्षात ठेवण्यासारखा काल. ○

MANOOS (Weekly) ı 40 Paise ı Regd. No. M H–649

# निवेदन

शुक्रवार दिनांक ९ मे या दिवशी सायंकाळी 'नॅशनल यूथ फोरम' या संस्थेतर्फे रवींद्र सरोवर प्रकरणी विचारविनिमय करण्यासाठी पुण्यातील काही युवक संघटनांची एक अनौपचारिक बैठक योजण्यात आलेली होती. स्थळ : 'माणूस' कार्यालय. विविध प्रतिक्रिया व मतमतांतरे या बैठकीत व्यक्त झाली. सुमारे तास दीड तासाच्या चर्चेनंतर काही निर्णय घेतले गेले ते असे.

१. पुण्यातील प्रतिष्ठित नागरिकांच्या सहीचे एक पत्रक प्रसिद्ध करणे.

२ : पुण्यातील इतर सामाजिक संस्था व युवक संघटना यांच्याशी संपर्क साधून शक्यतो लवकर एक व्यापक बैठक बोलावणे.

३ : अशा व्यापक बैठकीत वा बैठकीनंतर कृती समितीची नेमणूक करणे व या समितीमार्फत पुढील कार्यक्रम ठरवणे.

४ : तोवर तात्पुरती संपर्क व्यवस्था १०२५ सदाशिव, मळेकर वाडा, पुणे २.

'माणूस' कार्यालयातील उपरोक्त बैठकीसंबंधी काही चुकीची माहिती प्रसृत झाल्याने हा खुलासा येथे देणे अगत्याचे वाटले.

— संपादक

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी संगम प्रेस, प्रा. लि., १७–ब, कोथरूड, पुणे ४ येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर